दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३०५ मंगळवार दि.१४ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-305 Tuesday, Dt.14 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# ‘माझ्या नादी लागू नका, मी उलटा फिरलो तर...’; सुरेश धसांचं जयंत पाटलांना थेट आव्हान

बीड : जयंत पाटील यांनी माझ्या नादी लागू नये, मी सहज डिवचायचा माणूस नाही. मी जर उलटा फिरलो तर तुम्हाला सुद्धा नीट सोडणार नाही. तुमची दादागिरी आणि नौटंकी तिकडे चालवायची, इकडे बीडमध्ये नाही, अशा अत्यंत आक्रमक आणि कडक शब्दांत भाजप आमदार सुरेश धस यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना जाहीर आव्हान दिलं. दुधाच्या दराच्या आणि इतर प्रश्नांवरून जयंत पाटील यांनी विधिमंडळ अधिवेशनात केलेल्या आरोपांना उत्तर देताना सुरेश धस यांनी बीडच्या मच्छिंद्रनाथ गडावर माध्यमांशी बोलताना हा थेट इशारा दिला. यामुळे बीडसह महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात नवा वाद पेटण्याची चिन्हे आहेत.

जयंत पाटील यांच्यावर निशाणा साधताना सुरेश धस पुढे म्हणाले, तुम्हाला पाहून बाकीचे लोक गप्प बसत असतील, पण आम्ही गप्प बसणार नाही. देवाने तुम्हाला जेवढे डोकं दिले आहे, त्यापेक्षा एक टक्का आमच्या देवाने आम्हाला जास्त डोकं दिले आहे. तुम्ही आमच्या भागात येऊन आम्हाला डिवचण्याचे काम करताय, मग आम्हीही तुमच्या भागात येऊन तुम्हाला डिवचू.

गळे ढरससळपस खींीश : जिओ टॅगिंगच्या नावाखाली लूट, धसांचा आरोप

सुरेश धस यांनी केवळ राजकीय इशाराच दिला नाही, तर महाविकास




आघाडी सरकारच्या काळातील जलसंपदा विभागाच्या कारभारावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, मविआ सरकारच्या काळात कोण जलसंपदा मंत्री होते? ज्यांच्या कालावधीत 'जिओ टॅगिंग'चा जीआर काढला गेला आणि त्याच्या नावाखाली संपूर्ण महाराष्ट्राची मोठी लूट झाली. हा नेमका काय प्रकार होता, हे येत्या पुढच्या अधिवेशनात पहिल्याच दिवशी सर्वांसमोर आणणार.

सुरेश धस यांनी पुढे बोलताना 'महालक्ष्मी' नावाच्या एका संस्थेचा उल्लेख करत अप्रत्यक्षपणे जयंत पाटलांवर निशाणा साधला. महालक्ष्मी सारखी संस्था नेमकी कोणाची आहे? त्याचे रजिस्ट्रेशन कोणाच्या नावावर आहे? त्या संस्थेमध्ये कोणाचा किती वाटा आहे आणि तिचे डायरेक्टर कोण कोण आहेत? ही सगळी माहिती आणि कुंडली मी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी बाहेर काढणार. धस यांच्या या अत्यंत आक्रमक पवित्र्यामुळे आगामी अधिवेशनात जलसंपदा विभागाचे 'जिओ टॅगिंग' आणि 'महालक्ष्मी संस्था' या मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मोठा गदारोळ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.जयंत पाटील यांनी माझ्या नादी लागू नये, मी सहज डिवचायचा माणूस नाही. मी जर उलटा फिरलो तर तुम्हाला सुद्धा नीट सोडणार नाही.

# पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड (जिमाका) :- राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई गोपीनाथ मुंडे या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.बुधवार दि. १५ जुलै २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने सकाळी ११ वाजता गेवराई येथे आगमन व शहरातील विविध विकास कामांची आढावा बैठक (स्थळ : नगर परिषद सभागृह, गेवराई), सकाळी ११.४५ वाजता गेवराई येथून पाडळसिंगी ता.गेवराईकडे प्रयाण. दुपारी १२.१० वाजता आगमन व सुपरलक्ष्मी गोल्ड चक्की आटा उद्योगाचा शुभारंभास उपस्थिती. दुपारी १.३० वाजता पाडळशिंगी येथून बीडकडे प्रयाण. दुपारी २ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व परळी तिर्थक्षेत्र विकास आणि विविध शासकीय आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी ४ वाजता सह्याद्री फॅमिली रेस्टॉरंटचे उद्घाटनास उपस्थिती. सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृह, बीडकडे प्रयाण करतील. सायंकाळी ५.२० वाजता बीड, गेवराई व आष्टी मतदार संघाच्या कार्यकर्ते, अभ्यांगताच्या भेटीसाठी राखीव. रात्री ८ वाजतात बीड येथून परळी वैजनाथकडे प्रयाण व रात्री १० वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.



गुरुवार दि.१६ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ वाजता परळी, माजलगाव मतदार संघातील अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखीव (स्थळ : शासकीय विश्रामगृह, परळी वैजनाथ), दुपारी १.१५ वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव.

शुक्रवार दि.१७ जुलै २०२६ सकाळी ११ वाजता यशश्री निवासस्थान येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण. सकाळी ११.३० वाजता आगमन व जस्ट नॅचरल सेंद्रीय कॉप शॉपचे उदघाटनास उपस्थिती (स्थळ : आनंद नगर, अंबाजोगाई), दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत केज मतदार संघातील अभ्यांगतासाठी राखीव (स्थळ : जनसंपर्क कार्यालय, अंबाजोगाई), दुपारी ३.३० वाजता वाहनाने परळी वैजनाथकडे प्रयाण, दुपारी ४ वाजता यशश्री निवासस्थान येथे आगमन व राखीव. सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत परळी शहर व ग्रामीण कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव.शनिवार दि.१८ जुलै रोजी सकाळी ७ वाजता निवासस्थान येथून मांजरसुंबा ता .बीडकडे प्रयाण, सकाळी ८.३० वाजता आगमन व भाजपा तालुका संपर्क कार्यालयास भेट देत सकाळी ९ वाजता बीड मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

# तेलंगणातून अवैध गुटखा आणणाऱ्या किराणा दुकानदाराला अटक

## ४६ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त

देगलूर । प्रतिनिधी

तेलंगणा राज्यातून प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक करणाऱ्या चोंडी (ता. मुखेड) येथील किराणा दुकानदाराला देगलूर पोलिसांनी अटक करून ४६ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.१२ जुलै रोजी नळंगल-हनुमान हिप्परगा मार्गावरील जिडगे महाराज मठाजवळ पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचून एमएच-२६ बीजे-११७४ क्रमांकाची ढतड दङ १०० दुचाकी अडवली. झडतीत सागर पान मसाला व एसआर-१ सुगंधित तंबाखू अशी प्रत्येकी २३ पाकिटे आणि दुचाकीसह



एकूण ४६ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी माधव राचप्पा चोंडीकर (५१, रा. चोंडी, ता. मुखेड) याला अटक करण्यात आली असून, प्राथमिक चौकशीत त्याने प्रतिबंधित माल तेलंगणातून आणल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हणमंत शिंदे करीत आहेत.


तर अशा कारवाया पुढेही सुरू राहतील...सीमावर्ती भागातून होणाऱ्या प्रतिबंधित गुटखा व तंबाखूच्या अवैध वाहतुकीवर देगलूर पोलिसांचे सातत्याने लक्ष असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहतील, असे पोलीस उपनिरीक्षक हणमंत शिंदे यांनी सांगितले.

# ‘लाडकी बहीण’मधून ९२ लाख महिला का वगळल्या गेल्या?

## कॅगचे ताशेरे आणि बीडमधील गोंधळावर मंत्री अदिती तटकरेंचा मोठा खुलासा

मुंबई /प्रतिनिधी

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतील ३,५४२ कोटी रुपयांच्या खर्चावर 'कॅग'ने ताशेरे ओढल्यानंतर आणि योजनेतून तब्बल ९२ लाख महिलांना वगळण्यात आल्याच्या चर्चेने राज्यात मोठी खळबळ उडाली होती. विशेषतः बीड जिल्ह्यातील अपात्र महिलांच्या आकडेवारीवरून राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाला होता. या सर्व घडामोडींवर आता राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले असून, पात्र आणि अपात्र महिलांची नेमकी आकडेवारी समोर ठेवली आहे.



अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, ऑगस्ट २०२५ पासून या योजनेसाठी ई-केवायसी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. यासाठी महिलांना तब्बल ६ महिन्यांची मुदत देण्यात आली होती, तर त्रुटी दूर करण्यासाठी एप्रिलपर्यंतचा वेळ देण्यात आला होता. वारंवार संधी देऊनही अनेक महिलांनी या प्रक्रियेची पूर्तता न केल्याने त्यांना योजनेतून बाद करण्यात आले आहे.

अपात्र ठरलेल्या महिलांची प्रमुख कारणे व आकडेवारी:ई-केवायसी आणि अंतिम छाननी प्रक्रियेनंतर खालील कारणांमुळे लाभार्थ्यांच्या संख्येत घट झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे:

ई-केवायसी न केलेल्या महिला (६० लाख) : योजनेची ई-केवायसी प्रक्रिया ऑगस्ट २०२५ पासून सुरू करण्यात आली होती. यासाठी ६ महिन्यांचा मोठा कालावधी देण्यात आला होता आणि त्रुटी दुरुस्त करण्यासाठी एप्रिल २०२६ पर्यंत मदत केली गेली. मात्र, वारंवार संधी देऊनही ६० लाख महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली नाही.

आयकर दाते (५ लाख) : आयकर विभागाच्या डेटा पडताळणीमध्ये ५ लाख महिलांचे कुटुंब करदाते असल्याचे स्पष्ट झाल्याने त्या अपात्र ठरल्या.उत्पन्न मर्यादा (१४ ते १५ लाख) : ज्या महिलांच्या पतीचे किंवा कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे, अशा १४ ते १५ लाख महिलांचा डेटा समोर आल्याने त्यांना वगळण्यात आले.चारचाकी वाहन मालक (४.५ ते ५ लाख) : कुटुंबाच्या नावावर चारचाकी वाहन असल्याच्या निकषात न बसल्यामुळे साडेचार ते पाच लाख महिला अपात्र ठरल्या आहेत.ज्या महिलांनी ई-केवायसी पूर्ण केली आहे, मात्र तरीही त्यांना लाभ मिळालेला नाही, अशा तक्रारींची सध्या प्रशासनाकडून युद्धपातळीवर पडताळणी सुरू असल्याचेही अदिती तटकरे यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातून तब्बल २८ लाख महिला अपात्र ठरल्याची जोरदार चर्चा सोशल मीडिया आणि राजकीय वर्तुळात सुरू होती. बीड जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या संख्येवरून पसरलेल्या अफवांचा समाचार घेताना मंत्री तटकरे यांनी सांगितले की, बीड जिल्ह्याबाबत चाललेली चर्चा पूर्णपणे तथ्यहीन आहे.

# स्मार्ट मीटरबाबत अफवा पसरविणाऱ्यांवर महावितरणचा कायद्याचा बडगा.!

## 'कॅमेरा' असल्याची दिशाभूल करणारी माहिती प्रसारित, ग्राहक प्रतिनिधी व यूट्यूब संपादकाविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल

मुंबई । प्रतिनिधी

महावितरणच्या स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा निराधार व दिशाभूल करणारा दावा सोशल मीडियाद्वारे प्रसारित केल्याप्रकरणी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्राहक संघटनेचे प्रतिनिधी नंदन मेघश्याम वेंगुर्लेकर आणि 'कोकणसाद' यूट्यूब न्यूज चॅनेलचे संपादक सागर चव्हाण यांच्याविरुद्ध सावंतवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महावितरणने या प्रकरणाची गंभीर दखल घेत नागरिकांमध्ये भीती, संभ्रम व गैरसमज निर्माण करणारी खोटी माहिती प्रसारित केल्याबद्दल संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सावंतवाडी पोलीस करीत आहेत.

महावितरणने स्पष्ट केले आहे की, स्मार्ट मीटर हे अत्याधुनिक, सुरक्षित व मान्यताप्राप्त तंत्रज्ञानावर आधारित असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा कॅमेरा किंवा गोपनीयतेचा भंग करणारी यंत्रणा नाही. त्यामुळे नागरिकांनी सोशल मीडियावरील अप्रमाणित, कपोलकल्पित व दिशाभूल करणाऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.सावंतवाडी येथे स्मार्ट मीटर विषयावरील चर्चासत्रात महावितरणचे उपकार्यकारी अभियंता योगेंद्र वाघ यांनी संबंधित आरोपांचे तत्काळ खंडन करून वस्तुस्थिती स्पष्ट केली होती. मात्र, या खुलाशाकडे दुर्लक्ष करून 'स्मार्ट मीटरची चिरफाड' या शीर्षकाखाली दिशाभूल करणारा व्हिडिओ प्रसारित करण्यात आल्याचा आरोप महावितरणने केला आहे.स्मार्ट मीटरसंदर्भात खोटी, दिशाभूल करणारी अथवा अफवाजन्य माहिती प्रसारित करून नागरिकांची दिशाभूल करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध भविष्यातही कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा महावितरणने दिला असून, नागरिकांनी केवळ अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे,



# जातेगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

# ७.७५ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने गेवराई तालुक्यातील जातेगाव येथे छापा टाकून महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला विविध कंपन्यांचा ७ लाख ७५ हजार ५४० रुपयांचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी एका संशयिताविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दि. १२ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक उपविभाग गेवराई हद्दीत अवैध धंद्यांविरोधात गस्त घालत असताना गुप्त माहिती मिळाली की, जातेगाव येथील एका शेतातील गोठा व ऊस पिकामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित गुटखा साठवून ठेवण्यात आला आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने छापा टाकला.

छाप्यात जनावरांच्या गोठ्यात तसेच ऊस पिकामध्ये लपवून ठेवलेला विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा हस्तगत करण्यात आला. जप्त मुद्देमालाची किंमत ७,७५,५४० रुपये इतकी आहे.

या प्रकरणी अमोल महादेवराव धोंडरे (वय ३०, रा. जातेगाव, ता. गेवराई) याच्याविरुद्ध तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २१८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १२३, २७४ व २७५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोलीस हवालदार अंकुश वरपे, गोविंद राख,



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# दिग्गजांना धक्का!

यंदाच्या फिफा विश्वकप फुटबॉल स्पर्धेच्या इतिहासात एक नवा अध्याय लिहिला गेला आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांमध्ये एकाच वेळी खेळवली जाणारी ही स्पर्धा सुरुवातीपासूनच मोठी रंगतदार ठरली आहे. ४८ संघांच्या नव्या फॉरमॅटमुळे प्रत्येक सामना रोमांचक झाला. बलाढ्य संघांना प्रत्येक टप्प्यावर कठीण आव्हानांचा सामना करावा लागला. त्यामुळे फिफा विश्वकप २०२६ ही केवळ विश्वचषक स्पर्धा न राहता फुटबॉलमधील बदलत्या समीकरणांची मोठी कहाणी बनली. यंदाच्या स्पर्धेत जर्मनी, ब्राझील, पोर्तुगाल आणि नेदरलँड या दिग्गज संघांचे अनपेक्षित पराभव सर्वांनाच धक्का देणारे ठरले. पॅराग्वे, नॉर्वे, मोरोक्को, बेल्जियम आणि केप व्हर्डे या संघांनी आपल्या दमदार खेळाने जगभरातील फुटबॉल रसिकांचे लक्ष वेधून घेतले.

४८ संघांच्या नव्या फॉरमॅटमुळे प्रत्येक सामन्यात नवा ट्विस्ट पहायला मिळाला. त्यामुळे कोणता संघ विजेता ठरेल ते निश्चितपणे सांगणे अवघड झाले. विशेष म्हणजे अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे तिन्ही यजमान देश स्पर्धेबाहेर गेले आहेत. यंदाच्या स्पर्धेचा भावनिक पैलू म्हणजे अर्जेंटिनाच्या लिओनेल मेस्सीचा हा अखेरचा विश्वचषक आहे. आणखी एक दिग्गज फुटबॉलपटू पोर्तुगालचा रोनाल्डो याच्यासाठीही ही अखेरची स्पर्धा ठरली. त्याचा संघ पराभूत झाल्याने विश्व विजेतेपदाचे रोनाल्डोचे स्वप्न अधुरे राहिले. या दोघांसाठीही प्रत्येक सामना भावनिक आणि संस्मरणीय ठरला. मेस्सीचे आव्हान अजून कायम आहे. ही स्पर्धा संस्मरणीय ठरवण्याची त्याला संधी आहे. यंदाच्या स्पर्धेच्या विजेतेपदाचे दावेदार म्हणून फ्रान्स, स्पेन आणि अर्जेंटिना या संघांची नावे सर्वाधिक चर्चेत आहेत. फ्रान्स, अर्जेंटिना आणि स्पेन संघांच्या सातत्यपूर्ण कामगिरीमुळे उपान्त्यपूर्व फेरीतील लढती अधिक रंगतदार बनल्या. डार्क हॉर्स गणला गेलेला बेल्जियम, मोरोक्को संघाची झुंज, नॉर्वे संघाचा आत्मविश्वास आणि नवख्या केप व्हर्डेचा ऐतिहासिक प्रवास यामुळे या विश्वचषकाची अखेर नेमक्या कोणत्या संघाच्या विजयाने होईल ते सांगता येत नाही. जगभरात कुठेही नाव नसलेल्या केप व्हर्डेया अवघी ५ लाख लोकसंख्या असलेल्या देशाने जगभरातील फुटबॉलप्रेमींची मने जिंकली आहेत. हा संघ स्पर्धेबाहेर गेला असला तरी या संघाने शानदार खेळाचे जे दर्शन घडवले त्याबद्दल त्या देशात जल्लोष सुरू असून संघाच्या स्वागतासाठी जंगी तयारी करण्यात आली आहे. यंदाची स्पर्धा अनेक कारणांमुळे खास ठरणार आहे. यंदा प्रथमच ४८ संघांचा स्पर्धेत समावेश करण्यात आला असून एकूण १०४ सामने खेळवले जात आहेत. स्पर्धा ११ जूनला सुरू झाली असून १९ जुलैला समाप्त होणार आहे. अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांमधील १६ शहरांमध्ये सामने खेळवले जात असल्याने यंदाचा विश्वचषक भौगोलिकदृष्ट्याही सर्वांत मोठा मानला जात आहे. केप व्हर्डे, कुरासाओ, जॉर्डन आणि उझबेकिस्तानसारख्या नवोदित संघांना पहिल्यांदाच विश्वचषकाच्या मुख्य रंगमंचावर खेळण्याची संधी मिळाली. त्यामुळे स्पर्धेत बलाढ्य संघांइतकेच नव्या संघांचेही प्रदर्शन चर्चेचा विषय ठरले. यंदाच्या स्पर्धेत केवळ संघ संख्या वाढलेली नाही, तर एआय तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. ऑफसाईड तंत्रज्ञान, कनेक्टेड बॉल, गोल-लाईन टेक्नॉलॉजी आणि रेफरी (पंच) कॅमे-यामुळे निर्णय अधिक वेगाने आणि अचूक घेण्याचा प्रयत्न केला जात आहे.मात्र, तंत्रज्ञान असूनही काही निर्णयांवर वाद झाले आणि त्यावरून चर्चा रंगली. अर्जेंटिना-ईजिप्त सामन्यात हा वाद अधिक उफाळून आला. पंचाच्या पक्षपाती निर्णयाचा आम्हाला फटका बसला अशी तक्रार ईजिप्त संघाने फिफाकडे केली आहे. त्यामुळे जितकी चर्चा रोमांचक सामन्यांची झाली, तितकीच एआय तंत्रज्ञान आणि पंचांच्या निर्णयांचीही झाली. सर्वांत जास्त चर्चा झाली ती मोठ्या उलथापालथींची.अनेक बलाढ्य संघ अपेक्षेपेक्षा खूप लवकर स्पर्धेबाहेर गेले, तर कमी अनुभवी संघांनी आपल्या दमदार खेळाने जगभरातील चाहत्यांची मने जिंकली. प्रत्येक फेरीत नवा निकाल आणि नवा हिरो पहायला मिळाल्याने ही स्पर्धा अधिकच रोमांचक बनली आहे. सर्वांत मोठा धक्का जर्मन संघाला बसला. पॅराग्वेविरुद्धचा सामना निर्धारित वेळेत १-१ असा बरोबरीत सुटल्यानंतर पेनल्टी शूटआऊटमध्ये पॅराग्वेने ४-३ असा विजय मिळवत जर्मनीला स्पर्धेबाहेर पाठवले. अनेक फुटबॉलतज्ज्ञांनी या निकालाला यंदाच्या स्पर्धेतील सर्वांत मोठ्या आश्चर्यापैकी एक मानले आहे. जर्मनीची गच्छन्ती ही केवळ पराभवाची बातमी नव्हती, तर नव्या जर्मन पिढीकडून असलेल्या मोठ्या अपेक्षांना मोठा धक्का होता. ब्राझीलचेही तसेच! नॉर्वेने २-१ अशा फरकाने ब्राझीलला स्पर्धेबाहेर केले ही स्पर्धेतील सर्वांत मोठी चर्चेची घटना ठरली. ब्राझील संघात नेमार, विनिसियस ज्युनियरसारखे स्टार खेळाडू असूनही ब्राझीलला अपेक्षित कामगिरी करता आली नाही.

# सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीला पक्षातूनच आक्षेप

**मुंबई : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या पक्षातील राष्ट्रीय अध्यक्ष पदावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते आणि राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी थेट वकिलांमार्फत नोटीस पाठवून प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पक्षाच्या अध्यक्षांसह वरिष्ठ नेत्यांना ९ जुलै रोजी त्यांनी ही नोटीस बजावली असून राष्ट्रीय अध्यक्ष पदाची निवडणूक पुन्हा घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष या नात्याने सुनेत्रा पवार, कार्यकारी अध्यक्ष म्हणून प्रपुल्ल पटेल आणि पक्षाचे सचिव म्हणून ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यात, २६ फेब्रुवारी २६ रोजी घेण्यात आलेली पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांची निवडणूक ही अवैध असल्याचे म्हणत ती रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली आहे. याबाबत स्वतंत्र आणि नि:पक्षपाती असा निवडणूक अधिकारी नेमून त्यांच्या मार्फत निवडणूक घेण्यात यावी. तोपर्यंत राष्ट्रीय अध्यक्ष आणि सुधारीत ऑफिस बेअररची यादी देखील रद्द समजावी, असेही नोटीसमध्ये बजावण्यात आले आहे.

२६ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादीच्या सर्वसाधारण सभेत प्रफुल पटेल यांच्याकडूनच ही घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता या निवडीला आक्षेप घेत सुनेत्रा पवार यांना नोटीस बजावण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले होते. मात्र, २८ जानेवारी रोजी विमान अपघातात अजित पवारांचे निधन झाले, त्यानंतर, राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणा केली. पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. त्यामुळे, सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपदासह पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचीही जबाबदारी देण्यात आली आहे. मात्र, आता याच निवडीला राष्ट्रवादी पक्षातूनच आक्षेप घेण्यात आला आहे.

## प्रसिद्धीसाठी नोटीस, निवड कायदेशीर मार्गानेच

ज्या व्यक्तीने नोटिस पाठवली त्याने केवळ प्रसिद्धीसाठी हे केलेलं आहे, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवड कायद्याला धरून आहे, असे राष्ट्रवादीचे सरचिटणीस सूरज चव्हाण यांनी म्हटले. राष्ट्रीय कार्यकारिणीत अध्यक्ष पदाची निवड झाल्यानंतर राष्ट्रीय अध्यक्षाला इतर निवडीचा अधिकार असतो, त्यानुसार प्रफुल पटेल यांची राष्ट्रीय कार्याध्यक्ष आणि सुनील तटकरे यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड प्रक्रिया पार पडली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष निवडीवेळी नव्या संविधानाचा दाखल दिलेला आहे, तो चुकीचा आहे लवकरच आम्ही याबाबत बोलणार आहोत, असेही सूरज चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# पावसाअभावी सोयाबीन, तूर-कापूस पिके आली धोक्यात

## आता शेतकऱ्यांच्या आभाळाकडे नजरा, जमिनीतील ओलावा वेगाने कमी होत असल्याने पिकांना पाण्याची आवश्यकता

टाकरवण / प्रतिनिधी

पावसाने दडी मारल्यामुळे खरिपतील महत्वाची सोयाबीन, कापूर, तूर ही पिके धोक्यात आली आहे. यामुळे शेतकऱ्यांना भविष्यात निर्माण होणारे मोठे आर्थिक संकट भेडसावत आहे. पिकांच्या जीवनदानासाठी टाकरवण (ता. माजलगाव) शिवारातील शेतकरी वरुणराजाच्या कृपादृष्टीसाठी आभाळाकडे नजरा लावून बसला आहे.

गतवर्षी अतिवृष्टीने खरिपातील हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. त्यानंतर रब्बीतील पिकांवर मदार ठेवलेल्या शेतकऱ्यांची सततचे धुके, गारपीट आणि वादळी वारा, ढगाळ वातावरणाने निराशा केली. पिकांचे उत्पादन घटल्याने निर्माण झालेली तूट भरुन निघाली नाही. यामुळे मुलाबाळांचे शिक्षण, मुला-मुलींच्या लग्न घरखर्चा भागवताना सर्वसामान्य शेतकऱ्यांना मोठा आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. परंतु तरी देखील काळ्याआईवर भरोसा ठेवून यंदातरी वरुणाराजाच्या कृपादृष्टीने सुगीचे चांगले दिवस पहायला मिळतील, असा विश्वास शेतकऱ्यांना होता. मृग नक्षत्रात सुरुवातीचे दिवस झालेल्या थोड्याफार पावसामुळे शेतकऱ्यांनी व्यक्त केलल्या विश्वासाला बळीही मिळाले परंतु पुढेमात्र पावसाचा निर्माण झालेला दिर्घकालीन खंड शेतकऱ्यांना मनात एलनीनोच्या प्रभावाची धास्ती निर्माण करुन केला. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच रिमझीम का होईना पावसाला सुरुवात झाल्याने पेरण्या बऱ्यापैकी उरकल्या. जमिनीत ओलावा असल्याने पिके उगवली परंतु पुन्हा पाऊस गायब झाला आहे.



बीड - येथील जिल्हा परिषदेच्या नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून पदभार घेतलेल्या श्रीमती जयश्री चव्हाण यांचा दैनिक समर्थ राजयोग आणि पत्रकार संघाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन बीड जिल्ह्यात स्वागत करत पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देताना संपादक तथा प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी. यावेळी पत्रकार संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष लोकजगतच्या संपादक शेख आयेशा मॅडम, वडवणी येथील ग्रामीण पत्रकार एजाज शेखसह मान्यवर.

# सगरोळीच्या श्री रा.छ.शा.सै.शाळेत पालक मेळाव्यात आई-वडिलांसह गुणवत्तांचा सत्कार संपन्न

## अंबाजोगाई येथील श्रीया कुलकर्णी आणि आदित्यराजे सिरसाट हेही ठरले पात्र

अंबाजोगाई / सुनिल सिरसाट

सगरोळी येथील संस्कृती संवर्धन मंडळाच्या राजर्षी श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयात संपन्न झालेल्या पालक मेळावा तथा बैठकीत गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये आंबेजोगाईचे कुलकर्णी-सिरसाट दोघेजण बाजी मारत पात्र ठरले.

महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवर असणा-या संस्कृती संवर्धन मंडळाच्या राजश्री श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालयामध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वर्गातून आणि शाळेतून प्रथम-द्वितीय-तृतीय आलेल्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. यावेळीच्या सत्कार समारंभाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे यावेळी हा सत्कार केवळ गुणवंताचा न करता गुणवंतांसह त्याच्या आई-वडिलांचाही करण्यात आला.





स्वातंत्र्यानंतर अगदी खरतड काळात पहिल्याच दशकात राष्ट्रीय स्वयं संघाच्या विचाराने प्रेरित असणारे आणि पूर्णवेळ संघाचे कार्य करणारे देशभक्त बाबासाहेब देशमुख यांनी मराठवाडा मुक्त तथा स्वतंत्रही झाला नव्हता. तोपर्यंतच संस्कृती संवर्धन मंडळाची स्थापना करून त्या अंतर्गत श्री शिवाजी हायस्कूल या नावाने एक छोटस शैक्षणिक संकुल सुरू केले. या छोट्याशा रोपट्याचे हळूहळू झाडात रूपांतर करताना अनेक अडचणी, संकटांना तोंड देत बाबासाहेबांनी फुले-शाहू-आंबेडकर आणि डॉ.हेडगेवार यांच्या विचारधारेवर या शैक्षणिक संकुलाचे अगदी गुरुकुल पद्धतीने केवळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण देत त्या संकुलाचे वृक्षात रूपांतर केले. यादरम्यान बराच काळ गेला. परंतु त्यांनी एका छोट्याशा रोपट्यापासून झाडात आणि झाडातून वृक्षापर्यंत रूपांतर करताना केलेले निस्वार्थ शैक्षणिक कार्य पाहून त्यांना केवळ नांदेड जिल्ह्यातच नाही तर सभोवतालच्या दोन-चार जिल्ह्यांसह आजचा तेलंगणा परंतु तत्कालीन हैदराबाद संस्थानातही सीमेवरील काही भागात एक खराखुरा निस्वार्थ शिक्षण महर्षी म्हणून ओळखले जाऊ लागले. कालांतराने ते आपल्या सर्वांतून देवाघरी निघून गेले.

परंतु त्यांच्या मुलांनी वडिलांचे हे शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्य जपण्याचा मनोमन मानस ठेवत तो वृक्ष वटवृक्षामध्ये रूपांतरित केला. आणि हे करत असतानाच माझ्या या अतिशय दुर्गम भागातून देशासाठी केवळ आयएएस-आयपीएस आणि इतर विभागातील विभागात उच्च दर्जाचे अधिकारी म्हणून जाताना देशाच्या तिन्ही दलामध्ये एक दर्जेदार, निर्भीड, धाडसी अधिकारी जाऊन देशाचे संरक्षण व्हावे. या विचाराने प्रेरित होत राजश्री श्री छत्रपती शाहू सैनिकी विद्यालय या नावाने सैनिकी शाळा सुरू केली. आणि हळूहळू ज्या पद्धतीने श्री शिवाजी हायस्कूलच्या माध्यमातून या राज्याच्या, देशाच्या भविष्यात हातभार लागावा म्हणून वेगळ्या खात्यात-विभागात अधिकारी-कर्मचारी रुपात हजारो तरुण-तरुणी पाठवल्या. अगदी त्याच धरतीवर सैनिकी विद्यालयाच्या माध्यमातूनही शेकडो तरुण तिन्ही दलात अधिकारी म्हणून तर पाठवलेच. परंतु यासोबतच आयएस-आयपीएस अधिकारी म्हणूनही अनेक तरुणांना देश सेवेत पाठवले. आणि आता अलीकडच्या पाच-सात वर्षात तर काय शिक्षण महर्षी कै. बाबासाहेब देशमुख यांचे नातू श्री.रोहित देशमुख आणि त्यांची पत्नी सौ.श्रद्धा रोहित देशमुख हे दाम्पत्य आपल्या आजोबांचा वारसा काका आणि वडिलांच्या मार्गदर्शनाखाली अगदी काटेकोरपणे जोमाने चालवत असून महाराष्ट्रातल्या पहिल्या पाच मध्ये मानांकन मिळवत आवर्जून सगरोळी सैनिकी विद्यालयाची ओळख निर्माण केली आहे. एवढेच नाही तर अलीकडच्या काळात या सैनिकी विद्यालयामध्ये मुलींच्या शिक्षणालाही परवानगी मिळवली असून आता तर या वर्षात या शाळेस केंद्रीय सैनिक शाळेचा दर्जा मिळाला असून, आता या सैनिकी विद्यालयात केंद्र सरकारच्या प्रणालीतून प्रवेश प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

शिक्षण महर्षी कै.बाबासाहेबजी देशमुख यांनी लावलेल्या रोपट्याचा ७०-७५ वर्षात एक महाकाय शैक्षणिक वटवृक्ष झाल्याची साक्ष बाबासाहेबांनी संकुल-गुरुकुल उभा करताना लावलेल्या रोपट्यांचे झालेले मोठमोठे वड-पिंपळ-चिंच-नांदुरकी यांसह आगदी गर्द झाडे-वृक्षच सातत्याने सांगतायेत आणि साक्ष देतायेत की, होय अगदी स्व.बाबासाहेबजी देशमुख यांच्या पावलावर पाऊल टाकत नातू आणि या नातवाच्या खांद्याला खांदा लावत नातसून बाबासाहेबांनी आखून दिलेल्या चाकोरीच्या बाहेर न जाता आधुनिक काळातील नियमावलीला धरूनच शिक्षण महर्षी बाबासाहेबांच्या चाकोरीत कटिबद्ध राहत ही सैनिकी शाळा चांगलीच नावारुपाला आणली आहे.

हे सारे करताना दरवर्षी या शाळेत शाळा सुरू झाल्यानंतर पहिल्या दीड-दोन महिन्यातच पालक मेळावा आयोजित केला जातो. आणि या मेळाव्यामध्ये गतवर्षी गुणांकन-मानांकन मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा उत्साह आणखीनच वाढावा आणि जगाच्या स्पर्धेमध्ये या विद्यार्थ्यांनी कायम टिकून राहाव म्हणून त्यांची अभ्यासाची प्रेरणा आणखीनच प्रेरित व्हावी. म्हणून पाचवी ते बारावी पर्यंतच्या वर्गातून प्रथम-द्वितीय-तृतीय आलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा आणि संपूर्ण शाळेतून प्रथम आलेल्या एक विद्यार्थी आणि विद्यार्थिनीचा सत्कार तथा गुणगौरव केला जातो. तेंव्हा त्याच धर्तीवर याहीवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तथा गुणगौरव समारंभ पालक मेळाव्यात आयोजीत केला गेला. परंतु त्यातील एका आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्याने यावेळी सर्वच पालकांना-विद्यार्थ्यांना आकर्षित केले. त्याचे कारण ही तसेच होते. यावेळीच्या सत्कार-गौरवामध्ये केवळ संबंधित गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनीचा सत्कार न करता त्यांच्यासोबत त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करून एक आगळावेगळा पाईंडा तथा आदर्श निर्माण करण्याचे काम सगरोळी येतील या सैनिक विद्यालयाने केल्याने हाही विषय मोठा चर्चेचा ठरला. यावेळी या गौरव सोहळ्यामध्ये विशेष बाब म्हणजे मुळातच आंबेजोगाईला मराठवाड्याचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक माहेरघर म्हणून ओळखले जाते आणि मग त्यातच ही आंबेजोगाईची परंपरा-ओळख जशासतशी जपण्याचे काम आंबेजोगाईच्या जिल्हा सत्र न्यायालयातील मुख्य सरकारी वकील श्री. ॲड. अशोकरावजी कुलकर्णी यांची नात व डॉ. कौस्तुभ कुलकर्णी (वैद्यकीय अधिकारी) डॉ.गौरी कुलकर्णी यांची जेष्ठ कन्या कु.श्रेया डॉ.गौरी कौस्तुभ कुलकर्णी हिने संपूर्ण शाळेतून मुलींमधून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला तर सातवी कक्षातून चि.आदित्यराजे डॉ.ज्योती सुनिल सिरसाट याने तृतीय क्रमांक मिळवत आपल्या शाळेची गुणांकन परंपरा जपताना अंबाजोगाईची ओळख अगदी महाराष्ट्र-तेलंगणा-आंध्रप्रदेश सीमेवर जपताना आई-वडिलांचाही बहुमान वाढवला.

शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य प्रा.गिरीश आलुरकर यांच्या मार्गदर्शनानुसार शाळेतील प्रशासकीय अधिकारी तथा एकेकाळचे सैन्यातील दबंग असे नावाजलेले मोठा नावलौकीक मिळवले उच्च अधिकारी श्री.संतोषजी कल्लेवार जे निवृत्तीनंतर या सैनिकी शाळेचे व्यवस्थापन सांभाळतात. त्यांच्या कडक शिस्तीत आणि काटेकर नियोजना अधिपत्याखाली शाळेचे संपूर्ण शिक्षक वृंद प्रचंड मेहनत घेत अगदी विद्यार्थ्यांना आपल्या स्वतःच्या मुलासारखे सांभाळत शाळेचा उत्तम दर्जाचा निकाल कायम राखत विद्यार्थ्यांची काळजी घेत असल्याने दिवसेंदिवस या शाळेतील प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी वाढते आहे. परंतु शासनाच्या नियमापलीकडे जाऊन प्रवेश देता येत नसल्याने आणि तुकड्यांची परवानगी अपेक्षित प्रमाणात मिळत नसल्याने अनेक पालकांसह-विद्यार्थ्यांचा भ्रमनिराश होत असल्याची खंत श्री.संतोष कल्लेवार यांनी बोलून दाखवली. परंतु आहे त्यातून अगदी उत्तम निकाल देण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो असेही यावेळी बोलताना श्री.कल्लेवार यांनी सांगितले. पालक मेळाव्यानंतर अतिशय उत्तम दर्जाच्या स्नेहभोजन व्यवस्थेने पालकांना निरोप देऊन कार्यक्रमाचा समारोप केला गेला. यावेळी शाळेच्या मॅनेजमेंट, शिक्षक वृध्दांसह उपस्थित पालकांनी गुणवंत तथा गौरवीत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी बहुसंख्येने राज्याच्या कानाकोपऱ्यातून माता-पिता स्वरूपात पालक उपस्थित होते.







# विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देणारा समाजोपयोगी उपक्रम

## वीरशैव माहेश्वर मंडळ, पुणे जिल्हातर्फे गुणवंतांचा गौरव, गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण

पुणे । प्रतिनिधी

समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतानाच आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला आधार देण्याच्या सामाजिक बांधिलकीतून वीरशैव माहेश्वर मंडळ, पुणे जिल्हा (स्था. १९४६) यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थी गौरव व शिष्यवृत्ती वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमात समाजभूषण तथा प्रसिद्ध उद्योजक मा. गुरूराजजी चरंतीमठ, फर्ग्युसन महाविद्यालयाचे विभागप्रमुख डॉ. सुशीलकुमार धनमने (अध्यक्ष), ज्येष्ठ अभ्यासक डॉ. शामाताई घोणसे आणि प्रा. डॉ. भिमाशंकर स्वामी यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यात आले.

शिक्षण, गुणवत्ता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या कार्यक्रमास समाजबांधव, सभासद, हितचिंतक व देणगीदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपस्थित सर्व मान्यवर, सभासद, हितचिंतक आणि देणगीदारांचे मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# महिला लोककला महोत्सवातून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचे बीडकरांना अनोखे दर्शन..!

## लावण्या, ओव्या आणि छक्कडच्या ताल-सुरांनी बीडचे यशवंतराव चव्हाण नाट्यगृह न्हाऊन निघाले




समाजसेवेचा संकल्प, रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या

## नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

**गेवराई /प्रतिनिधी**
**रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या २०२६-२७ वर्षासाठीच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ रविवारी भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी गणेश कुलकर्णी यांनी अध्यक्षपद, तर धर्मराज करपे यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली.**

कार्यक्रमाची सुरुवात रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांच्या प्रतिमेचे पूजन व रोपाला पाणी घालून करण्यात आली. जि. प. कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. मावळते अध्यक्ष तथा पब्लिक इमेज चेअरमन प्रा. राजेंद्र बरकसे यांनी प्रास्ताविक केले, तर मावळते सचिव तथा कार्यकारी सचिव प्रवीण जैन यांनी वर्षभरातील उपक्रमांचा आढावा सादर केला. त्यानंतर प्रा. राजेंद्र बरकसे यांनी अध्यक्षपदाची धुरा गणेश कुलकर्णी यांच्याकडे, तर प्रवीण जैन यांनी सचिवपदाची कॉलर धर्मराज करपे यांना प्रदान केली.

प्रमुख पाहुण्या पीडीजी डॉ. मंजू फडके यांच्या हस्ते नूतन संचालक मंडळ व नव्या सभासदांना रोटरीची अधिकृत पिन प्रदान करण्यात आली. इंजि. नितीन गोपन, सुहास लाहोटी, रो. विष्णू जाधव व रो. संकेत काळे यांनीही कार्यक्रमात सहभाग घेतला. कुमारी प्रांजल मनोज टाक हिने राम ही कविता सादर केली. समारोपात धर्मराज करपे यांनी आभार मानले, तर सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले.

या सोहळ्यास राजेंद्र डेंगे, राधाकिसन लड्डा, सीए रविंद्र गिरी, डॉ. नागनाथ मोटे, प्रदीप मुक्कावार, रामदास शिंदे, प्रा. रामप्रभु मुंडे, मनोज टाक, उमेश बजाज, नगरसेवक विजय मोटे, निखिल काला, किशोर जाधव, ओमप्रकाश बेद्रे, नागनाथ घसिंग, ड. सुभाष निकम, नामदेव खेडकर, प्रा. सुरेश पाटील, सुरेश मानधने, अरुण परदेशी, नितीन कुलथे, दीपक पुरी, सतीश पल्लेवाड, सावता नाईक, परीक्षित करपे, संतोष कोठेकर, शिवाजी झेंडेकर, प्रा. शरद सदाफुले, ठवरे, बद्रिनाथ करपे यांच्यासह बीड जिल्ह्यातील रोटरी क्लबचे पदाधिकारी, रोटेरियन, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बीड /प्रतिनिधी
महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री मा. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय महिला लोककला महोत्सवाचा दिमाखदार शुभारंभ शुक्रवार, दि. ११ जुलै रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या महोत्सवाला बीडकर रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत नाट्यगृह खचाखच भरून गेले.

उद्घाटन समारंभाला प्रा. सुशीला मोराळे, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. सतीश साळुंखे, चित्रपट अभिनेते, लेखक व दिग्दर्शक डॉ. सुधीर निकम, नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. संजय पाटील देवळानकर, लोककला संशोधक तथा मुंबई विद्यापीठाच्या लोककला विभागाचे प्रमुख डॉ. गणेश चंदनशिवे, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त लावणी नृत्यांगना प्रमिला लोदगेकर, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे पाईकराव तसेच महोत्सवाचे संयोजक प्रा. विनोद दळवी, पत्रकार वैभव स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनानंतर लोककला जतन करण्यात महिलांचे योगदान या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. लोककला म्हणजे काय, समाजजीवनातील तिचे स्थान, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आध्यात्मिक जीवनात लोककलांची भूमिका, लोककलांच्या जतन-संवर्धनासाठी राबविण्यात येणारे उपक्रम तसेच महिला लोककलावंतांचे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील योगदान अशा विविध विषयांवर उपस्थित मान्यवरांनी अभ्यासपूर्ण मते मांडली.

परिसंवादात प्रा. सुशीला मोराळे यांनी लोप पावत चाललेल्या पारंपरिक ओव्यांचे सादरीकरण करून उपस्थितांना भावविश्वात नेले. त्यानंतर डॉ. गणेश चंदनशिवे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची गाजलेली माझी मैना गावावर राहिली ही छक्कड सादर करत कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली.राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त लावणी नृत्यांगना प्रमिला लोदगेकर आणि त्यांच्या सहकलावंतांनी पारंपरिक लावणीचे सौंदर्य, तिची अभिजातता आणि सादरीकरणातील शास्त्रीय बाजू रसिकांसमोर प्रभावीपणे उलगडून दाखवली. उंच माढीवर चला, चांदीची गं लोटी, दुल्लडी, या रावजी अशा गाजलेल्या लावण्यांच्या सादरीकरणाने यशवंतराव चव्हाण नाट्यगृह अक्षरशः दुमदुमून गेले. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.याशिवाय विविध महिला लोककलावंतांच्या संघांनी मंगळागौर, दिवटी नृत्य, एकतारी भजन, भारूड तसेच लोप पावत चाललेले अनेक पारंपरिक लोककलाप्रकार सादर करून महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवले. लोकजीवनाचे वास्तव प्रतिबिंब आणि सांस्कृतिक वारशाची श्रीमंती या सादरीकरणांतून प्रकर्षाने जाणवली.महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर दुसऱ्या दिवशीही लोककलेची पर्वणी अनुभवण्यासाठी बीडकर रसिकांनी मोठी गर्दी केली.



महाराष्ट्र शासनाच्या महिला लोककला महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन,
**लोककलेच्या जतन-संवर्धनाचा जागर..!!**

महिला लोककलावंतांना राज्यस्तरीय व्यासपीठ उपलब्ध करून देतानाच लोप पावत चाललेल्या लोककलांच्या जतन आणि संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश या महोत्सवातून देण्यात येत आहे.

महोत्सवाचे संयोजक प्रा. विनोद दळवी आणि त्यांच्या संपूर्ण टीमने केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे हा राज्यस्तरीय सांस्कृतिक सोहळा अत्यंत यशस्वीपणे पार पडत असून, बीडच्या सांस्कृतिक इतिहासात या महोत्सवाची नोंद एका संस्मरणीय पर्वणी म्हणून होत आहे.

# ग्राहकांच्या शंकांचे निरसन, माळापुरीत स्मार्ट मीटरला ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद

## संवादातून निर्माण झाला विश्वास अन् ६० स्मार्ट मीटरची पुन्हा झाली यशस्वी बसवणी..!



बीड । प्रतिनिधी
बीड शहरालगतच्या माळापुरी येथील काही वीजग्राहकांनी स्मार्ट मीटरबाबत शंका व्यक्त करत काढून टाकलेले मीटर महावितरणच्या शाखा कार्यालयात जमा केले होते. या पार्श्वभूमीवर महावितरणने तातडीने संवाद साधत ग्रामपंचायत कार्यालयात बैठक घेऊन ग्राहकांच्या सर्व शंकांचे निरसन केले. त्यानंतर ग्रामस्थांनी सकारात्मक भूमिका घेत आतापर्यंत सुमारे ६० ग्राहकांच्या घरी स्मार्ट मीटरची पुन्हा यशस्वी बसवणी करण्यात आली असून उर्वरित ठिकाणीही काम सुरू आहे.कार्यकारी अभियंता सुबोध डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार्यकारी अभियंता मनोज पवार, शाखा अभियंता अक्षय राठोड व पेंडगाव कक्षातील कर्मचाऱ्यांनी सरपंच अशोक ढास व उपसरपंच बेग यांच्या सहकार्याने ग्रामस्थांशी सुसंवाद साधला. बैठकीत स्मार्ट मीटरचे कार्य, अचूक बिलिंग, पारदर्शक वीज वापर नोंद, ग्राहकांना होणारे फायदे आणि तक्रार निवारण व्यवस्थेची माहिती देण्यात आली. तसेच वीजबिलासंदर्भातील शंका व तक्रारींचे तत्काळ निराकरण करून भविष्यातही ग्राहकांना आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही देण्यात आली.महावितरणने प्रत्येक बुधवारी उपविभागीय कार्यालयात ग्राहक तक्रार निवारण मेळावा आयोजित केला जात असल्याची माहितीही दिली. या संवादात्मक भूमिकेमुळे ग्रामस्थांचा विश्वास वाढला असून स्मार्ट मीटर बसविण्यास त्यांनी सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे.जनसंपर्क अधिकारी धनंजय पवार यांनी सांगितले की, स्मार्ट मीटर ही डिजिटल युगाची गरज असून त्यामुळे ग्राहकांना वीजवापरावर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवता येते. तसेच सौरऊर्जा वापरणाऱ्या ग्राहकांना टीओडी योजनेअंतर्गत प्रति युनिट ८५ पैशांची सवलत मिळण्याचाही लाभ उपलब्ध आहे. ग्राहकांच्या समाधानालाच महावितरणने सर्वोच्च प्राधान्य दिले असून संवादातून विश्वास निर्माण करण्याचे प्रयत्न पुढेही सुरू राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.



## पाटोदा जिल्हा परिषद शाळेत रोबोटिक्स लॅब व शालेय साहित्य वितरण

**आ. सुरेश धस यांची उपस्थिती, डॉ. प्रदीप नारायणकर यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक**

पाटोदा । प्रतिनिधी
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, पाटोदा येथे झक्छ ढशलहपेश्रेसू झ्रीं. डींव., पुणे यांच्या वतीने शालेय साहित्य वितरण व रोबोटिक्स लॅब पाहणी कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस प्रमुख उपस्थित होते.

शाळेचे माजी विद्यार्थी व झक्छ ढशलहपेश्रेसू चे सीईओ डॉ. प्रदीप नारायणकर यांनी गतवर्षी शाळेत रोबोटिक्स लॅब उभारल्यानंतर यंदाही विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे आ. धस यांनी कौतुक करत, हा उपक्रम इतर माजी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

यावेळी आ. धस यांनी जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी 'मिशन जरेवाडी पॅटर्न' व 'आमदार श्री सुंदर शाळा योजना' राबविण्यात येत असून, शाळांच्या पायाभूत सुविधांसाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार दत्तात्रय निलावड, गटविकास अधिकारी संतोष माने, गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे, नगराध्यक्षा दिपाली जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८२६ दि.१३.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**
अर्जदार **सुलताना गफुर सय्यद, रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुलताना गफुर सय्यद | स्वतः | २४.१०.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६२८ दि.-.-.-**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**
अर्जदार **संजय दिलीप मुळे, रा.महाकाळा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आयुष संजय मुळे | मुलगा | ०१.०४.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८२७ दि.१३.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**
अर्जदार **शेख मोबीन मुबारक, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख मोबीन मुबारक | स्वतः | ०७.०२.१९९२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसील कार्यालय, कळंब**
जा.क्र.२०२६/मह/दंडणी/कावी- दिनांक ०६/०७/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांचे मार्फत पठाण निकहत लतिफखाँ रा. शिराढोण ता. कळंब यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक पठाण निकहत लतिफखाँ रा. शिराढोण ता. कळंब यांचे गाव शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा शिराढोण ता. कळंब जि.धाराशिव या ठिकाणी दि. २७/०५/१९९२ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांनी दि. २४/०६/२०२६ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

**तहसील कार्यालय, कळंब**
जा.क्र.२०२६/मह/दंडणी/कावी- दिनांक ०६/०७/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांचे मार्फत डांगे सुरैय्याबी अ.रज्जाक, रा. शिराढोण ता. कळंब यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक डांगे सुरैय्याबी अ.रज्जाक, रा. शिराढोण ता. कळंब यांचे गाव शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा शिराढोण ता. कळंब जि.धाराशिव या ठिकाणी दि. ०३/०६/१९७४ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांनी दि. २४/०६/२०२६ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

**तहसील कार्यालय, कळंब**
जा.क्र.२०२६/मह/दंडणी/कावी- दिनांक ०६/०७/२०२६

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांचे मार्फत पठाण इफतआरा लतिफखाँ, रा. शिराढोण ता. कळंब यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारक पठाण इफतआरा लतिफखाँ , रा. शिराढोण ता. कळंब यांचे गाव शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा शिराढोण ता. कळंब जि.धाराशिव या ठिकाणी दि. ०४/०३/१९९४ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी शिराढोण ता. कळंब यांनी दि. २४/०६/२०२६ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

### टी.सी हरवली आहे

बावस्कर योगेश साळूबा रा.देहेड ता.भोकरदन जि.जालना यांची विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेज वाशिम डी फार्मसी सेकंडियर पासची टी सी भोकरदन ते जाफराबाद प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणास सापडल्यास या नंबर वर संपर्क ९९२१४७०८०६ साधावा

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४७६/२०२६**
**सीताबाई भ्र.विष्णू पायघडे वि. निरंक**
**(ॲड. एस. पी. येवले, गेवराई मार्गे)**

ज्याअर्थी मयत नामे कृष्णा पि. विष्णु पायघडे, रा. भडंगवाडी पो. मादळमोही ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २५/०६/२०२४ रोजी भडंगवाडी पो. मादळमोही ता. गेवराई येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार सिताबाई भ्र. विष्णु पायघडे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. भडंगवाडी पो. मादळमोही ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत कृष्णा पि. विष्णु पायघडे यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०८/०७/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

पुढील तारीख - २५/०८/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा बीड येथे जिल्हास्तरीय स्पर्धेस १६ जुलैपासून सुरुवात

बीड (जिमाका) :- देशातील अत्यंत प्रतिष्ठित आणि सर्वात जुनी राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या जिल्हास्तरीय सामन्यांना दि.१६ जुलै २०२६ पासून बीडमध्ये सुरुवात होत आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सन २०२६-२७ या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धांचा शानदार शुभारंभ होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथील मैदानावर दि. १६ आणि १७ जुलै २०२६ या कालावधीत ही जिल्हास्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि. १६ जुलै २०२६ रोजी १७ वर्षांखालील मुले आणि मुलींचे सामने, १७ जुलै २०२६ रोजी १५ वर्षांखालील मुलांचे सामने आयोजित करण्यात आले आहेत. १७ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. १५ वर्षांखालील वयोगटासाठी खेळाडूचा जन्म १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. तसेच, १५ वर्षांखालील खेळाडूंना एआयएफएफ मान्यताप्राप्त वय निश्चितीबाबतची चाचणी करून घेणे बंधनकारक आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज आणि प्रवेश शुल्क पावती दि. ११ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वीकारली जाईल. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी होण्यापूर्वी सर्व खेळाडू व संघांची ु.ीीर्लीोंर्ली.ळिप या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे. केवळ नोंदणीकृत आणि प्रवेश फी भरलेल्या संघांनाच स्पर्धेत प्रवेश दिला जाईल.

जिल्हास्तरीय स्पर्धेत सरस कामगिरी करणाऱ्या संघांची पुढे विभागस्तर आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाईल. राज्यस्तरीय स्पर्धेत विजेत्या ठरणाऱ्या संघाला नवी दिल्ली येथे 'सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी'तर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या मुख्य राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. भारतीय हवाई दलाचे एअर मार्शल सुब्रतो मुखर्जी यांच्या स्मरणार्थ १९६० पासून ही स्पर्धा राष्ट्रीय पातळीवर तळागाळातील फुटबॉलला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाते. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी क्रीडा अधिकारी कालिदास होसुरकर (भ्रमणध्वनी- ९४२१५९५५१५) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असेही कळविले आहे.

# मालमत्ता नोंदींच्या प्रती देण्यास टाळाटाळ, आंदोलनाचा इशारा



माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगर परिषद प्रशासनाकडून मालमत्तेशी संबंधित प्रमाणित कागदपत्रे वेळेत दिली जात नसल्याचा आरोप पीपल्स रिपब्लिकन पार्टीने केला आहे.

मालमत्ता क्र. २९/५१५ संदर्भातील नोंदींच्या प्रतींसाठी अर्ज करूनही महिनाभर उलटून माहिती मिळालेली नसल्याचे तालुकाध्यक्ष राकेश साळवे यांनी सांगितले.

यासंदर्भात मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देऊन नामांतर, गहाणखत, वारसाहक्क, हक्कसोड आदी आदेशांच्या प्रमाणित प्रती तातडीने देण्याची मागणी करण्यात आली आहे. न्यायालयीन कामकाजासाठी ही कागदपत्रे आवश्यक असून प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

माहिती तातडीने उपलब्ध न झाल्यास कायदेशीर लढ्यासह लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राकेश साळवे व सिद्धार्थ ससाणे यांनी दिला आहे.

## जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांतर्गत कंत्राटी नोकरीसाठी अर्ज सादर करावेत

बीड (जिमाका) :- जिल्ह्यातील माजी सैनिक, त्यांच्या वीरपत्नी आणि अवलंबितांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजगाराची उत्तम संधी चालून आली आहे. बीड जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या बीड आणि अंबाजोगाई येथील सैनिकी मुलांच्या वसतिगृहांमध्ये विविध पदावर तात्पुरत्या, रोजंदारी आणि कंत्राटी स्वरूपात भरती प्रक्रिया राबविली जात आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

कंत्राटी भरतीमध्ये वसतिगृह अधीक्षक (१ पद), सहाय्यक वसतिगृह अधीक्षक (२ पदे), चौकीदार (२ पदे), महिला स्वयंपाकी (४ पदे), माळी कामगार (१ पद) आणि सफाई कामगार (२ पदे) अशा पदांचा समावेश आहे. या भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना विशेष प्राधान्य दिले जाणार असले, तरी नागरी उमेदवारांनाही या पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. या भरतीसाठी अर्ज करणारा उमेदवार निर्व्यसनी असणे अत्यंत आवश्यक आहे. यातील चौकीदार हे पद निवासी स्वरूपाचे असल्याने त्यांच्या कामाची वेळ २४ तासांची असेल, तर सहाय्यक वसतिगृह अधीक्षक पदासाठी संगणकाचे ज्ञान आणि टायपिंग अवगत असणे बंधनकारक करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दि.२० जुलै २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बीड येथे प्रत्यक्ष जमा करायचे आहेत. अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र आणि आधारकार्ड यांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख नंतर कळवण्यात येईल. या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त माजी सैनिक व नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले असून, अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ०२४४२-२२२१०५ या संपर्क क्रमांकावर विचारणा करावी. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# महावितरणच्या कारभाराविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन




बीड । प्रतिनिधी

महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात आणि विजेच्या धक्क्याने मृत्यू झालेल्या चिंचोटी येथील माऊली गोंडे व हाजीपूर येथील कृष्णा उगले यांच्या कुटुंबीयांना न्याय व आर्थिक मदत मिळावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बोंबाबोंब आंदोलन करण्यात आले.यावेळी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. मृत्यू प्रकरणांची सखोल चौकशी, दोषींवर कारवाई, मान्सूनपूर्व दुरुस्तीच्या कामांची चौकशी, स्मार्ट मीटरची सक्ती थांबविणे आणि गेवराई उपविभागातील कथित ५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.आंदोलनात विविध सामाजिक, राजकीय संघटनांचे पदाधिकारी व माहिती अधिकार कार्यकर्ते सहभागी झाले. तसेच बीड शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणारे वीज खांब व रोहित्र तातडीने स्थलांतरित करून महावितरणच्या कामकाजात पारदर्शकता आणण्याची

# शेतकर्यांवर अन्याय करू नका - बाळराजे पवार



गेवराई /प्रतिनिधी

गोरगरीब शेतकर्यांवर अन्याय करू नका, त्यांच्या शेत जमीनी गेल्या वर्षीच्या पावसाच्या अस्मानी संकटात खरडून गेल्या, उभी पिके अक्षरश: वाहून गेली आहेत. त्याचा मोबदला त्यांना मिळालाच पाहिजे, एकाही शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्या, नसता शेतकर्यांसाठी आंदोलन करावे लागेल, असा इशारा बाळराजे पवार यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, या संदर्भात वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन पुढील निर्णय घेण्याचे आश्वासन उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार संजय सोनवणे यांनी दिले आहे.

गेवराई तालुक्यातील सिंदफणा आणि गोदावरी नदीच्या काठच्या शेतकर्यांची शेत जमीन गेल्या वर्षी पावसाळी हंगामात, म्हणजेच सप्टेंबर २०२६ च्या वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीने खरडून गेली होती. या आस्मानी संकटात उभ्या पिकांचा दाणादाण उडाली, जमिनी खरडून गेल्या आणि शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेला होता. बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर कृषी विभाग, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून पंचनामे केले होते. हिरापूर, टाकळगाव, कानडा पिंपळगाव आणि एरंडगाव या चारही गावांतील मिळून जवळपास २५० एकर शेतजमीन आणि मोसंबी, आंबा, सीताफळाच्या फळबागा वाहून गेल्या होत्या. मात्र, जेव्हा सरकारी अनुदानाची यादी जाहीर झाली, तेव्हा शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला. २५० एकरचे नुकसान झाले असताना केवळ १० ते १२ शेतकऱ्यांची नावे यादीत आली आणि तीही अवघ्या ५ हजार रुपयांच्या मदतीसाठी, शेतकऱ्यांनी लावलेला आरोप अत्यंत गंभीर असून, या संदर्भात सोमवार ता. १३ रोजी दुपारी एक वाजता भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी वंचित राहीलेल्या शेतकर्यांसह तहसील कार्यालयात जाऊन, उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार संजय सोनवणे यांची भेट घेऊन शेतकर्यांची बाजू मांडली.यावेळी नप चे माजी सभापती भरत गायकवाड, प्रा. येळापुरे, अशोक चव्हाण, सरपंच घाटूळ काका,सचीन गव्हाणे , जगन्नाथ गव्हाणे, दिनेश निर्मळ, दत्ता ढोरमारे, राजू पटेल, इस्माईल पटेल, गजानन गव्हाणे बाबू गव्हाणे, राहून धापसे , किशोर धापसे, रामप्रसाद गव्हाणे, महेश गव्हाणे,सुनील गिरी यांची उपस्थिती होती.

# ओबीसी जनगणनेसाठी बीडमध्ये एकजुटीची वज्रमुठ, राज्यव्यापी जनआंदोलनाची घोषणा

बीड । प्रतिनिधी

अनुसूचित जाती-जमातीप्रमाणेच ओबीसींचीही जातीनिहाय जनगणना व्हावी, या प्रमुख मागणीसाठी सावता परिषदेच्या वतीने बीड येथील अमृत मंगल कार्यालयात ओबीसी जनगणना चर्चासत्र उत्साहात पार पडले. चर्चासत्रात ओबीसी समाजातील सुमारे ८० समाज संघटनांचे २८० प्रतिनिधी सहभागी झाले.

सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी हा लढा कोणत्याही पक्षाच्या विरोधात नसून ओबीसी समाजाच्या घटनात्मक हक्कांसाठी असल्याचे सांगत राज्यव्यापी 'ओबीसी जनगणना यात्रा' काढण्याची घोषणा केली.

राज्यातील खासदारांना निवेदने देणे, स्वाक्षरी अभियान, राष्ट्रपती, पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना ई-मेलद्वारे निवेदने पाठविणे तसेच तालुका व जिल्हास्तरावर धरणे, मोर्चे आणि जनजागृती अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी प्रा. सुशीलाताई मोराळे, बालाजीराव शिंदे, कल्याणराव दळे, गुफ्रान अन्सारी, प्रा. विष्णू जाधव, इंजि. व्ही. व्ही. बन, डॉ. शिवाजीराव राऊत, बालासाहेब दोडतले, प्रा. पी. टी. चव्हाण आणि डॉ. लक्ष्मण जाधव यांनी मार्गदर्शन केले.

या चर्चासत्राला लक्ष्मण ढवळे, शालिनी बुंधे, युवराज शिंदे, शरद भांडेकर, विष्णू देवकते, अर्जुन दळे, प्रकाश कानगावकर, गंगाधर पुरी, रमेश कैवाडे, सुधीर जाधव, परमेश्वर वाघमोडे, बापूराव भालेकर, बप्पा घुगे, रफिक बागवान, प्रकाश कोंका, अर्जुन बहिरवाळ, लक्ष्मण गुंजाळ, राजेंद्र जव्हेरी, गणेश जगताप, गणेश पुजारी, सय्यद साजेदभाई, सादेकभाई अंबानी, शेख जाकेरभाई, मीनाक्षी देवकते, सुघोष मुंडे, अनिल मुळेकर, राजू ताटे, राजेश शिंदे, दगडू गायकवाड, अभय बिडकर, भूषण पवार, रमेश राऊत, मंगेश लोळगे, संभाजी गुरव, लहू गव्हाणे, अविनाश शिंगनाथ, अजिंक्य आनेराव, विशाल राऊत, सुरेश असलेकर, हाशमभाई बागवान, हारुणभाई बागवान, बंडू खांडेकर, सुरेंद्र कावरे, संजीवनी राऊत, दगडू म्हेत्रे, दिनेश गायकवाड, राजेश गवळी, मुकेश शिवगन, एकबालभाई शिकलकर, खुदुसभाई आतार, इब्राहिमभाई तांबोळी, बाबूभाई आतार, मौलाना इकबाल कुरेशी, लक्ष्मणसिंह ठाकूर, दिपक चौगुले, बाबूलाल ढोरमारे, किशोर शिंदे, गुलाब चव्हाण, कृष्णा संकोड, माऊली शिरसाट, रामेश्वर पवार, रामेश्वर सोनटक्के, प्रधान पवार, कैलास काटे, कैलास रंगदळ, रवी गंगावणे,




दत्ता परदेशी, संतोष पाबळे, रामेश्वर कानडे, कृष्णा उपरे, अतुल कासार, परमेश्वर जाधव, बळीराम चोपणे, बळीराम यादव, चिंतामण सत्वधर, विश्वास आखाडे, सचिन दूधाळ, नामदेवराव दूधाळ, मोहनराव गोरे, संतराम पानखडे यांच्यासह विविध समाज संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. राजीव काळे, किशोर राऊत, विष्णू खेत्रे, प्रा. रणजीत आखाडे, सुनील शिंदे, अशोक हजारे, राजाभाऊ गवळी, शामराव शिंदे, महादेव कदम, दादासाहेब चौधरी, सुधीर चौधरे, बाबा वाघुले, सचिन दूधाळ, बाळासाहेब रासवे, लक्ष्मीकांत शिंदे, दत्ता ढवळे, राधेश्याम लेंडाळ, हनुमान गायकवाड, बाबासाहेब शिंदे आणि बाबुराव राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.

चर्चासत्रातून सरकारला स्पष्ट संदेश देण्यात आला की, ओबीसींची जातीनिहाय जनगणना ही सामाजिक न्याय, आरक्षणाचे योग्य नियोजन आणि विकास निधीच्या समतोल वाटपासाठी अत्यावश्यक आहे. त्यामुळे सरकारने या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांना मान्यता द्यावी, अशी एकमुखी मागणी उपस्थितांनी केली.

# शेतकरी प्रश्नांवर राष्ट्रवादी (शरद पवार)चे तहसीलदारांना निवेदन



कळंब । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) कळंब तालुक्याच्या वतीने तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना शेतकरी प्रश्नांबाबत निवेदन देण्यात आले.

निवेदनात निकृष्ट बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीची तातडीने चौकशी करून पंचनामा, दोषींवर कारवाई व बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली. तसेच पीकविमा योजनेतील नव्या जाचक अटी रद्द करून पूर्वीप्रमाणे सुलभ व अल्प दरात पीकविमा उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. मागण्या मान्य न झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

यावेळी शहराध्यक्ष बाळासाहेब कथले, युवक तालुकाध्यक्ष भीमा हगारे, माणिकराव जाधव, भरत शिंदे, सलमा सौदागर, सुंदर बापू लोमटे, आत्माराम बिक्कड, बळवंत पवार, लक्ष्मण शिंदे, चेतन वाघमारे, विकास यादव, विठ्ठल कोकाटे, अफताब तांबोळी, समाधान वाघमारे, संकेत घोलप यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १२० वर्षे जुन्या तांब्याच्या भांड्यात शिजतोय महाप्रसाद

बीड - आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत मुक्ताबाईच्या पालखीचे बीडमध्ये मोठ्या भक्तिभावात स्वागत करण्यात आले. संत मुक्ताई आणि बीडकरांचे एक अतूट नाते असून, तब्बल ३२५ वर्षांची निजामकालीन परंपरा आजही जोपासली जात आहे. विशेष म्हणजे, स्वातंत्र्यपूर्व काळात शके १८२८ मध्ये खरेदी केलेल्या ऐतिहासिक तांब्याच्या आणि पितळी भांड्यांमध्ये आजही वारकऱ्यांसाठी महाप्रसाद बनवण्याची परंपरा बीडकरांच्या पाचव्या पिढीने कायम ठेवली आहे.

शनिवार आणि रविवार असे दोन दिवस मुक्ताईची पालखी बीडमध्ये विसावली होती. 'साधू संत येती घरा... तोचि दिवाळी दसरा' या भावनेतून बीडकरांनी वारकऱ्यांची मनोभावे सेवा केली. स्वातंत्र्यपूर्व काळात बीडमध्ये 'मराठा पंच मंडळ' कार्यरत होते. या मंडळाने मुक्ताईच्या पालखीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी खास तांब्याची आणि पितळी भांडी (बकेट, कढया, पातेले) खरेदी केली होती. या भांड्यांवर आजही शके १८२८ च्या नोंदी आढळतात. पंचांचा तो जुना दगडी वाडा आजही 'पंचाचा वाडा' म्हणून प्रसिद्ध आहे.

सोहळ्यात ५ पिढ्यांच्या परंपरेची दिसते साक्ष रविवारी सकाळी या ऐतिहासिक भांड्यांमध्ये वारकऱ्यांसाठी वरण, चपाती आणि भात असा खास महाप्रसादाचा बेत करण्यात आला आहे. तांब्याच्या भांड्यात शिजवलेल्या वरणाची लज्जतदार चव या पाच पिढ्यांच्या परंपरेची साक्ष देते. महाप्रसादासाठी पंचाच्या वाड्यातील दोन खोल्यांच्या भाड्यातून येणारी रक्कम आणि कबाडगल्ली, माळीवेस परिसरातील रहिवासी लोकवर्गणी गोळा करून या भोजनाचे नियोजन करतात.

# देह विठ्ठल, श्वास विठ्ठल... भक्तिरसात न्हाले जागतिक वारकरी कवी-काव्य संमेलन

पुणे । प्रतिनिधी

परिवर्तन स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पहिले जागतिक वारकरी कवी-काव्य संमेलन भक्तिमय वातावरणात संपन्न झाले. अध्यक्ष डॉ. मधुसूदन घाणेकर यांनी विठ्ठलाच्या नि:स्वार्थ भक्तीने जीवन सार्थक होते. 'देह विठ्ठल, श्वास विठ्ठल' हीच वारकरी संप्रदायाची खरी ओळख आहे, असे प्रतिपादन केले.



संमेलनात सुमारे १५० वारकरी सहभागी झाले. मधुकर्णिका सासवडे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन, संतोष सागवेकर यांनी स्वागत, तर श्रद्धा देवळे यांनी संयोजन केले.

यावेळी ३६ कवी-कवयित्रींना 'विठू माऊली पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला. तसेच 'डहाळी' या विश्वविक्रमी अनियतकालिकाच्या ११४४ व्या विशेष अंकाचे प्रकाशन झाले. वारकऱ्यांनी कविता, अभंग, भजने व भक्तिगीते सादर करून भक्तिरसाची अनुभूती दिली.

कार्यक्रमात विठ्ठल राजे पवार, दुर्गा अभय भोर, प्रकाश पांडे, संतोष महामुनी, संगीता पाचंगे, मंजुषा आवळकंठे, गणेश कदम, सागर काळे, आशुतोष भोसले आणि घाणेश विटकर यांना विविध 'विठू माऊली पुरस्कार-२०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात संमेलनाची उत्साहपूर्ण सांगता झाली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED- 431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)


# चारण्याची कोंबडी अन् बाराण्याचा मसाला एलपीजी सुरक्षा तपासणीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा

## अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचा थेट इशारा जालना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पेट्रोलियम मंत्रालयाला पाठवले निवेदन

जालना शेख फारुक :-

घरगुती एलपीजी गॅस जोडणीच्या सुरक्षा तपासणीच्या नावाखाली सर्वसामान्य ग्राहकांकडून तब्बल २२६ रुपये वसूल केले जात आहेत.ही सरळ सरळ लूट असून चारण्याची कोंबडी आणि बाराण्याचा मसाला अशी ग्राहकांची अवस्था झाली आहे. हा अन्यायकारक जुलमी कर त्वरित रद्द करा किंवा शुल्कात मोठी कपात करा अशी आक्रमक मागणी करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जालना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत थेट केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयालाच आव्हान दिले आहे.

क्शन कमिटीचा आक्रमक पवित्रा सुरक्षा तपासणी की वसुली मोहीम?

जालना जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात ग्राहक पंचायतीने गॅस कंपन्यांच्या मनमानी कारभाराचे वाभाडे काढले आहेत. अवघ्या १०० रुपयांत मिळणाऱ्या गॅस कनेक्शनवर सुरक्षा तपासणीच्या नावाखाली २२६ रुपयांचा भुर्दंड का? असा संतप्त सवाल या निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे.

ग्राहक पंचायतीने निवेदनात मांडलेल्या मुख्य मागण्या

सुरक्षा तपासणी पूर्णपणे मोफत किंवा अत्यंत नाममात्र शुल्कात करण्यात यावी.२२६ रुपये घेणार असाल तर केवळ गॅस पाईप पाहून चालणार नाही शेगडी,रेग्युलेटर,लीक टेस्ट आणि सर्व जॉइंट्सची दुरुस्ती याच शुल्कात झाली पाहिजे.

रेल्वे तिकिटाप्रमाणेच गॅस पावती किंवा एस एम एस वर ग्राहकांना त्यांच्या हक्काच्या अपघात विम्याची स्पष्ट व पारदर्शक माहिती देण्यात यावी.

सर्वसामान्य ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा हा निर्णय शासनाने तातडीने मागे घ्यावा, अन्यथा ग्राहक पेटून उठल्याशिवाय राहणार नाही

ग्राहक पंचायत पदाधिकारी

जिल्ह्यातील दिग्गजांची फौज मैदानात हे निवेदन देताना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जालना जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने देवगिरी प्रांताचे सदस्य ड.डी.पी.पाटील, जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश तारगे, उपाध्यक्ष डॉ.देवराव चौरे व ड.वसीम रफिक शेख,सचिव ड.महेश सीतारामजी धनावत.

सहसचिव श्री.सुरेंद्र पोतदार, कोषाध्यक्ष ड.महेश गोविंदराव भाले,लीगल सेल प्रमुख ड. मधुकरराव सोनवणे.

ग्राहक मार्गदर्शन केंद्र प्रमुख श्री. बालाप्रसाद जेथलिया,प्रचार प्रसिद्धी प्रमुख श्री.सतीश परमेश्वर अपार,पर्यावरण प्रमुख श्री.देवानंद चित्राल आणि आय. टी.सेल प्रमुख डॉ.स्वप्नील भगवानदास मंत्री यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कार्यकारिणी सदस्य श्री.बाबासाहेब बन्शी हेमके, श्री. हारी कदम,श्री.राहुल काळे, श्री. धर्माभाऊ खापरे,श्री.सुनील धारतर्कर आणि श्रीमती सलमा शेख यांच्यासह संघटनेचे इतर शिलेदारही या आंदोलनात हिरीरीने सहभागी झाले होते.

आता चेंडू केंद्र सरकारच्या कोर्टात ग्राहकांच्या सुरक्षेचा आणि त्यांच्या खिशाचा विचार करून केंद्र सरकारने यावर तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी एकमुखी मागणी करण्यात आली आहे. आता या आक्रमक निवेदनानंतर पेट्रोलियम मंत्रालय ग्राहकांना दिलासा देणार की गॅस कंपन्यांची अरेरावी सुरूच राहणार याकडे संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# सामाजिक कामे करताना आम्ही सदैव आपल्या सोबत राहु



इनरव्हील क्लबच्या आयोजित कार्यक्रम प्रसंगी वैद्यकीय अधिक्षक डॉक्टर अरुणा केंद्रे यांनी सांगितले

अंबाजोगाई (प्रतिनिधी )येथील इनरव्हील क्लब यांनी सोमवारी सकाळी कार्यक्रम झाला यावेळी वृद्धत्व आरोग्य आणि मानसिक आधार केंद्र अंतर्गत डायलेसिस विभागाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ सौ अरुणा केंद्रे यांनी यावेळी बोलताना म्हणाल्या की, डायलेसिस रुग्णांना विस हजार रुपयाचे मेडिसीन देऊन इनरव्हील ने रुग्णाचा आनंद द्विगुणित केला आहे. यावेळी मंचावर इनरव्हील च्या अध्यक्षा सौ कल्पना शिंदे उपस्थित होत्या.तसेच डॉ विकास कदम, आदी उपस्थित होते इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ कल्पना शिंदे यांनी औषधी, गोळ्या डॉ सौ अरुणा केंद्रे यांच्याकडे सुपूर्द केले पुढे बोलताना डॉ सौ अरुणा केंद्रे म्हणाल्या की, सामाजिक कामे करताना आम्ही सदैव आपल्या सोबत राहूत आणि इनरव्हील च्या कामाला शुभेच्छा दिल्या कल्पना शिंदे यांनी इनरव्हील चे कार्य सांगितले होते.कार्यक्रमांचे सूत्रसंचालन सौ रेखा शितौळे यांनी केले तर आभार सौ सुरेखा कचरे यांनी मानले. यावेळी गणेश बन,कमलेश आडिल,साधना वेडे, वैष्णवी राऊत,रतन गायकवाड, इनरव्हील सदस्य रेखा तळणीकर, सुरेखा कचरे, वर्षा ठाकूर, पत्रकार किरणताई देशमुख आदींची उपस्थित होती.

# महागाईच्या काळात १९ ते २० हजार रुपयांत संसार चालवणे अशक्य

## एमएसएसएफ जवानांच्या मानधन वाढीसाठी खा.बजरंग सोनवणे यांचा पुढाकार राज्य सुरक्षा महामंडळाला पत्र



केज/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ मध्ये कार्यरत हजारो जवानांच्या आर्थिक अडचणींचा प्रश्न ऐरणी वर आणत बीडचे खा. बजरंग सोनवणे यांनी त्यांच्या मानधनात तातडीने वाढ करण्याची मागणी केली आहे.महाराष्ट्र राज्य सुरक्षा महा मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना पत्र पाठवून जवानांच्या विद्यमान वेतन संरचनेचा पुनर्विचार करून त्यांना सन्मानजनक मानधन देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे,महाराष्ट्र राज्य सुरक्षा महा मंडळा मार्फत राज्यातील विविध शासकीय कार्यालये, मंत्रालय,न्यायालये, निमशासकीय संस्था, शैक्षणिक संस्था तसेच विविध सार्वजनिक आस्थापनांमध्ये सुरक्षा सेवा पुरविण्यात येत असून,या ठिकाणी कार्यरत जवान अत्यंत जबाबदारीने आणि दक्षतेने आपली कर्तव्ये बजावत आहेत. राज्याच्या सुरक्षा व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असलेल्या या जवानांवर मोठी जबाबदारी असतानाही त्यांच्या मानधनाचा प्रश्न अद्यापही कायम असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.सध्या एमएसएसएफ जवानांना सुमारे २८ हजार रुपये मासिक मानधन दिले जाते. मात्र,विविध वैधानिक कपातीनंतर त्यांच्या हातात प्रत्यक्षात केवळ १९ ते २० हजार रुपये इतकीच रक्कम उरते. आजच्या वाढत्या महागाईच्या काळात एवढ्या अल्प उत्पन्ना तून कुटुंबाचा उदरनिर्वाह,मुलांचे शिक्षण,आरोग्य खर्च, घरभाडे तसेच दैनंदिन गरजा भागविणे अत्यंत कठीण झालेअसल्याचे सोनवणे यांनी पत्रात स्पष्ट केले आहे.त्यांनी पुढे म्हटले आहे की, एमएसएसएफचे जवान दिवसरात्र विविध संवेदनशील ठिकाणी सुरक्षा व्यवस्था सांभाळत असतात.अनेकदा सण-उत्सव, आपत्कालीन परिस्थिती आणि विशेष बंदोबस्ता दरम्यानही त्यांना अखंड सेवा द्यावी लागते.एवढी जबाबदारी पार पाडणाऱ्या जवानांना त्यांच्या कार्याच्या तुलनेत मिळणारे मानधन अत्यल्प असल्याने त्यांच्यामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण होत आहे.

याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाने जवानांच्या मानधनाचा सर्वंकष आढावा घेऊन तातडीने वेतनवाढीचा निर्णय घ्यावा,अशी ठाम मागणी खासदार सोनवणे यांनी केली आहे.तसेच,राज्य सरकारने या प्रश्नाकडे केवळ आर्थिक बाब म्हणून न पाहता सुरक्षा यंत्रणेतील कर्मचाऱ्यांच्या सन्मान आणि सामाजिक सुरक्षिततेशी संबंधित विषय म्हणूनगांभीर्याने विचार करावा,असेही त्यांनी पत्रातून सुचविले आहे. एमएसएसएफ जवानांच्या वेतनवाढी चा प्रश्न गेल्या काही काळापासून सातत्याने चर्चेत आहे.विविध कर्मचारी संघटनां कडूनही मानधन वाढविण्याची मागणी होत असताना आता खासदार बजरंग सोनवणे यांनी अधिकृतपणे हा मुद्दा राज्य सुरक्षा महामंडळासमोर मांडल्याने या प्रश्नाला नवे राजकीय बळ मिळाले आहे.त्यामुळे राज्य सरकार आणि महामंडळ याबाबत कोणता निर्णय घेते, याकडे राज्यभरातील हजारो एमएसएसएफ जवानांचे लक्ष लागले आहे.

# समाजाच्या गरजा ओळखून दीर्घकालीन परिणाम घडवण्याचे कार्य रोटरी करते - माजी गव्हर्नर मंजू फडके..

## रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न

गेवराई, दि. १३ (प्रतिनिधी )- रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या २०२६-२०२७ चा नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ रविवारी भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.समाजसेवा, मैत्री आणि नेतृत्वाची परंपरा जपत नूतन अध्यक्ष म्हणून गणेश कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला तर धर्मराज करपे यांनी सचिवपदाची सूत्रे हाती घेतली.

कार्यक्रमाची सुरुवात रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोपाला पाणी घालून करण्यात आली. जि. प. कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमात मंगलमय वातावरण निर्माण झाले. उपस्थित मान्यवरांचे पुष्परोपे देऊन स्वागत करण्यात आले.

प्रास्ताविकात मावळते अध्यक्ष तथा पब्लिक इमेज चेअरमन प्रा. राजेंद्र बरकसे यांनी रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या स्थापनेचा प्रवास, सुरुवातीच्या काळातील सहकाऱ्यांचे योगदान आणि क्लबने समाजसेवेच्या माध्यमातून उभा केलेला विश्वास यांचा आढावा घेत पदग्रहण समारंभाचे महत्त्व अधोरेखित केले.

मावळते सचिव तथा कार्यकारी सचिव प्रवीण जैन यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करत वर्ष २०२५-२०२६ मध्ये रोटरी क्लबने शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, सामाजिक बांधिलकी आणि विविध सेवाभावी क्षेत्रांत राबविलेल्या उपक्रमांचा सविस्तर आढावा सादर केला.



यानंतर मावळते अध्यक्ष प्रा. राजेंद्र बरकसे यांनी नूतन अध्यक्ष गणेश कुलकर्णी यांच्याकडे अध्यक्षपदाची धुरा सोपविली. मावळते सचिव प्रवीण जैन यांनी नूतन सचिव धर्मराज करपे यांना सचिवाची कॉलर प्रदान करून पदभार सुपूर्द केला.

प्रमुख पाहुण्या पीडीजी डॉ. मंजू फडके यांच्या हस्ते नूतन संचालक मंडळ तसेच नव्या सभासदांना रोटरीची अधिकृत पिन प्रदान करण्यात आली.

नूतन अध्यक्ष गणेश कुलकर्णी यांनी मनोगतात मावळते अध्यक्ष आणि सचिव यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचा सन्मान केला. अध्यक्षपद हा केवळ सन्मान नसून समाजाप्रती असलेली मोठी जबाबदारी आहे, असे सांगत शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, महिला सक्षमीकरण आणि युवक विकास या क्षेत्रांत अधिक प्रभावी व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सह प्रांतपाल इंजि. नितीन गोपन आणि युथ सर्विस डायरेक्टर सुहास लाहोटी यांनी रोटरीच्या सेवाभावी कार्याचा गौरव करत नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. रो. विष्णू जाधव यांनी रोटरीच्या फोर-वे टेस्ट या नैतिक मूल्यांवर आधारित वाचन केले तर रो. संकेत काळे यांनी पीडीजी डॉ. मंजू फडके यांचा सविस्तर परिचय करून दिला.

प्रमुख मार्गदर्शन करताना पीडीजी डॉ. मंजू फडके यांनी रोटरीच्या जागतिक कार्याची माहिती दिली. पोलिओ निर्मूलन मोहिमेत रोटरीने बजावलेली ऐतिहासिक भूमिका, या अभियानासाठी करण्यात आलेली हजारो कोटी रुपयांची आर्थिक मदत आणि त्यामुळे जगातील बहुतांश देश पोलिओमुक्त झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. भारतातील ४५ रोटरी जिल्हे दरवर्षी हजारो सामाजिक प्रकल्प राबवित असून शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, पाणी, महिला सक्षमीकरण आणि युवक विकासासाठी साडेतीन हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याचे प्रकल्प कार्यान्वित करतात, असे त्यांनी सांगितले.

रोटरी ही केवळ सेवाभावी संस्था नसून प्रेम, मैत्री, नेतृत्व, व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यावसायिक नैतिकता जोपासणारी जागतिक चळवळ असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजाच्या गरजा ओळखून दीर्घकालीन परिणाम करणारे प्रकल्प राबविणे ही रोटरीची कार्यपद्धती असल्याचे सांगत रोटरीची पिन ही जगभरातील रोटेरियनांना जोडणारे विश्वासाचे प्रतीक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात कुमारी प्रांजल मनोज टाक हिने राम ही भावस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळविली.

समारोपात नूतन सचिव धर्मराज करपे यांनी उपस्थित मान्यवर, पाहुणे आणि सभासदांचे आभार मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा राजेंद्र बरकसे यांनी केले.

या पदग्रहण समारंभास रोटरी क्लबचे सदस्य राजेंद्र डेंगे, राधाकिसन लड्डा,सी ए रविंद्र गिरी, डॉ नागनाथ मोटे, प्रदिप मुक्कावार, रामदास शिंदे, प्रा.रामप्रभु मुंडे, मनोज टाक, उमेश बजाज,नूतन सदस्य नगरसेवक विजय मोटे, निखिल काला, किशोर जाधव, ओमप्रकाश बेद्रे, नागनाथ घसिंग ,गेवराई शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर ड सुभाष निकम, नामदेव खेडकर, प्रा.सुरेश पाटील,सुरेश मानधने, अरुण परदेशी, नितिन कुलथे, दीपक पुरी, सतीश पल्लेवाड, सावता नाईक, परीक्षित करपे, संतोष कोठेकर, शिवाजी झेंडेकर, प्रा . शरद सदाफुले, ठवरे, बद्रिनाथ करपे यांच्यासह बीड जिल्ह्यातील रोटरी क्लबचे पदाधिकारी, रोटेरियन, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २८ वर्षांची निष्कलंक सेवा होमगार्ड पीटीसी गणेश भवर यांना अश्रूपूर्ण सेवानिवृत्तीचा निरोप

## कर्तव्यनिष्ठेचा गौरव भोकरदनमध्ये भावनिक सेवानिवृत्ती सोहळा मा.रावसाहेब दानवे,मा.चंद्रकांत दानवे,राजाभाऊ देशमुख यांच्यासह मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

भोकरदन इसरारखान पठाण :-

कर्तव्यनिष्ठा,शिस्त, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांचे मूर्तिमंत उदाहरण ठरलेले भोकरदन होमगार्ड पथकाचे तालुका पीटीसी गणेश रंगनाथ भवर यांनी तब्बल २८ वर्षांची निष्कलंक सेवा पूर्ण करून सन्मानाने सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या गौरवासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय भोकरदन येथे आयोजित करण्यात आलेला निरोप समारंभ अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. मान्यवर सहकारी जवान आणि कुटुंबीयांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळयाने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तर मनात अभिमान निर्माण केला.

जिल्हा समादेशक, होमगार्ड जालना यांच्या कार्यालयातून २२ जून २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार स.क्र. ३०५ चे जवान गणेश रंगनाथ भवर यांनी ५ ऑगस्ट १९९८ पासून होमगार्ड दलात अविरत व प्रामाणिक सेवा बजावली. वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्याने नियमानुसार ७ जुलै २०२६ पासून त्यांना सन्मानपूर्वक सेवानिवृत्त करण्यात आले.

समारंभात उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.नितीन जी. कटेकर यांच्या हस्ते श्री.भवर यांचा पुष्पगुच्छ,शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. पारंपरिक फेटा बांधून त्यांचा गौरव करण्यात आला आणि तोंड गोड करून उपस्थितांनी त्यांच्या दीर्घ सेवेला सलाम केला.यावेळी प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड यांनी श्री.भवर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की सलग २८ वर्षे कोणताही डाग न लागता सेवा बजावणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. त्यांचे कार्य प्रत्येक होमगार्ड जवानासाठी प्रेरणादायी असून सेवानिवृत्तीनंतरही त्यांचे मार्गदर्शन संघटनेला लाभावे.

श्री. भवर यांच्या सेवानिवृत्तीची माहिती समजताच तालुक्यातील राजकीय, सामाजिक व व्यापारी क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव झाला. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी आमदार चंद्रकांत दानवे,राजाभाऊ



देशमुख यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी,व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटून तसेच दूरध्वनीद्वारे त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांनी एकमुखाने मत व्यक्त करताना सांगितले की निस्वार्थ प्रामाणिक आणि शिस्तबद्ध सेवा हेच श्री. भवर यांच्या आयुष्याचे खरे वैभव आहे. प्रत्येक सरकारी कर्मचाऱ्याने त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी.

उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर म्हणाले होमगार्ड दल हे पोलीस यंत्रणेचा मजबूत आधारस्तंभ आहे.श्री. गणेश भवर यांनी दाखवलेली कर्तव्यनिष्ठा आणि शिस्त ही नव्या पिढीसाठी आदर्श ठरेल. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

आपल्या मनोगतात श्री. गणेश भवर यांनी वरिष्ठ अधिकारी, सहकारी जवान आणि कुटुंबीयांचे ऋण व्यक्त करताना भावूक शब्दांत सांगितले हा गणवेश, हा सन्मान आणि सेवाकाळातील प्रत्येक क्षण माझ्यासाठी अमूल्य आहे. सर्वांच्या सहकार्यामुळेच मी ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडू शकलो.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी श्री. भवर यांना भावपूर्ण निरोप देत सामूहिक छायाचित्र घेतले. निरोपाच्या या क्षणी अनेकांचे डोळे पाणावले होते.या कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर, प्रशासकीय अधिकारी किशोर राठोड यांच्यासह होमगार्ड जवान मुस्ताक शहा, समाधान दसपुते, दिलीप बर्डे, पंडित घोडके, मनोहर वनारसे, आदेश साबळे, राजू फलके, तनवीर शेख, शेरखान पठाण शेरू, अमोल जाधव, राजकुमार लोखंडे, थिटे, मिरकर, देवरे तसेच भोकरदन, हसनाबाद व पारद पथकातील सर्व जवान, महिला होमगार्ड आणि श्री. भवर यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी कंपन्यांच्या चालकांना उद्योगपती समजून रेशन बंद केल्यास

## स्वाभिमानी स्टाईलने तीव्र आंदोलन

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना नोटीस मागे घेण्याचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांचे जाहीर आव्हान

घुंगर्डे हादगाव प्रतिनिधी :-

केंद्र आणि राज्य सरकारच्या जाचक धोरणांमुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर आता पुरवठा विभागाने नवीन सुलतानी संकट आणले आहे. जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या एफपीओ गरीब आणि अल्पभूधारक संचालक शेतकऱ्यांना खाजगी कंपन्यांचे श्रीमंत उद्योगपती समजून पुरवठा विभागाने त्यांच्या हक्काचे रेशन धान्य बंद केले आहे. हा प्रकार अत्यंत अन्यायकारक आणि संतापजनक असून प्रशासनाने या बेकायदेशीर नोटीसा तात्काळ मागे घेतल्या नाहीत, तर स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हाभर तीव्र रेशन बचाव आंदोलन छेडेल असा थेट इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी दिला आहे.

या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जालना जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सोमवार दि. २३ रोजी एक आक्रमक निवेदन सादर करण्यात आले.

कॉर्पोरेट मंत्रालयाचा डेटा मॅचिंगचा अजब कारभार

याबाबत तीव्र संताप व्यक्त करताना जिल्हाध्यक्ष सुरेश काळे म्हणाले की शासनानेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. मात्र, आता कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या एमसीए



चुकीच्या आणि यांत्रिक डेटा मॅचिंग प्रक्रियेमुळे मोठा गोंधळ उडाला आहे. ज्या गरीब शेतकऱ्यांकडे केवळ डायरेक्टर आयडेंटिफिकेशन नंबर आहे, त्यांना सरसकट श्रीमंत व्यावसायिक ठरवण्यात आले आहे. या तांत्रिक चुकीमुळे त्यांना रेशन कार्डवर मिळणारे स्वस्त धान्य तसेच इतर शासकीय सुविधा तातडीने बंद करण्यात आल्या आहेत. हा प्रकार गरीब शेतकऱ्यांच्या ताटात माती कालवणारा आहे.

केवळ कागदावर संचालक प्रत्यक्षात मात्र गरीब शेतकरी

वास्तविक पाहता हे संचालक शेतकरी कोणतेही मोठे टाटा-बिर्ला नसून सामान्य कोरडवाहू आणि अल्पभूधारक शेतकरी आहेत. या सहकारी तत्त्वावरील कंपन्यांमधून संचालकांना कोणतेही मोठे मानधन पगार किंवा नफा मिळत नाही. त्यांचे वैयक्तिक वार्षिक उत्पन्न अद्यापही राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या निकषांच्या आतच आहे. तरीही पुरवठा विभागाने केवळ तांत्रिक कारणावरून थेट रेशन कार्ड रद्द करण्याची मोहीम हाती घेतली आहे. सरकारच्या या जाचक भूमिकेमुळे धास्तावलेले शेतकरी आता कंपन्यांच्या संचालकपदाचे राजीनामे देत असून शेतकऱ्यांच्या सामूहिक प्रगतीची चळवळच धोक्यात आली आहे.

कृषी मंत्रालयाच्या आदेशाला केराची टोपली

केंद्रीय कृषी मंत्रालयाने देखील स्पष्ट निर्देश दिले आहेत की केवळ तांत्रिक कारणावरून कोणत्याही पात्र शेतकऱ्याचे रेशन कार्ड रद्द केले जाऊ नये, तर त्यांची स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष आर्थिक पाहणी करूनच निर्णय घ्यावा. मात्र जालन्याचा जिल्हा पुरवठा विभाग या आदेशाला स्पष्टपणे केराची टोपली दाखवत मनमानी कारभार करत असल्याचा आरोप स्वाभिमानीने केला आहे.

# अंबाजोगाईच्या भूमीत अवतरणारा भक्तीचा अलौकिक सोहळा

## संत नामदेव महाराज व संत जनाबाई अश्व रिंगण उत्सव!

पंढरीची वारी हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक जीवनाचे एक अनुपम वैभव आहे. आषाढीच्या वारीला लाखो वैष्णव विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे मार्गस्थ होतात. परंतु, जे वृद्ध, अगतिक किंवा काही कामाच्या व्यापामुळे पंढरीची वाट धरू शकत नाहीत, त्यांच्यासाठी पंढरीचे तेच चैतन्य, तोच भक्तीचा थरार आणि तोच अनुपम फील थेट अंबाजोगाईच्या भूमीत आणण्याचे अभूतपूर्व कार्य गेल्या अनेक वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. हा सोहळा म्हणजे अंबाजोगाईचा 'अश्व रिंगण सोहळा'.

वारकरी संप्रदायाची कीर्तन परंपरा आणि पार्श्वभूमी

वारकरी संप्रदायामध्ये प्रथम अभंग रचेते म्हणून संत नामदेव महाराजांचा अत्यंत आदराने उल्लेख केला जातो. संत ज्ञानेश्वर आणि नामदेव महाराज हे समकालीन संत असले, तरी वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेची सुरुवात ही नामदेव महाराजांपासूनच झाली; संप्रदायातील पहिले कीर्तन नामदेव महाराजांनीच केले. वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार भारतभर फिरून नामदेव महाराजांनी जेवढा केला, तेवढा इतर संतांनी कोणीच केला नाही. त्यांचे श्रेष्ठत्व एवढे मोठे आहे की, शिखांच्या पवित्र 'गुरु ग्रंथसाहिबा'मध्येही नामदेव महाराजांच्या जवळपास ६८ अभंगांचा समावेश केला गेला आहे.

अशा या महान संत श्रेष्ठ नामदेव महाराजांचा पालखी सोहळा त्यांच्या जन्मस्थळापासून, म्हणजेच 'नरसी नामदेव' येथून दरवर्षी आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघतो. याच वारीत गंगाखेडहून संत जनाबाईंचीही पालखी निघते. विशेष म्हणजे, नामदेव महाराज हे संत जनाबाईंचे गुरु होते आणि या गुरु-शिष्याची पहिली पावन भेट अंबाजोगाईच्या याच रिंगण सोहळ्याच्या निमित्ताने घडते, हा एक अत्यंत अद्भुत आणि भावुक संकल्पना-आविष्कार आहे.

मुहूर्तमेढ आणि वाटचाल: अंबाजोगाईकरांचा लोकोत्सव

पूर्वी या पवित्र पालख्या अंबाजोगाईवरून जात असत, परंतु स्थानिक नागरिकांना याची फारशी माहिती नसायची. २०१२ सालापूर्वी मराठवाड्यामध्ये कुठेच अशा पद्धतीचा गोल रिंगण सोहळा होत नव्हता, हे सोहळे केवळ पश्चिम महाराष्ट्रातच प्रसिद्ध होते. हीच उणीव ओळखून २०१२ मध्ये तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, सावता माळी भजनी मंडळ, बाबा महाराज जवळगावकर आणि इतर सहकाऱ्यांनी एकत्र येऊन अंबाजोगाईत या रिंगण सोहळ्याची मुहूर्तमेढ रोवली. मराठवाड्यात संपन्न होणारा हा पहिलाच ऐतिहासिक रिंगण सोहळा ठरला.

सुरुवातीला केवळ हजार-बाराशे लोकांच्या उपस्थितीत सुरू झालेला हा सोहळा नगराध्यक्ष तथा स्वागताध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली आज एका भव्य लोकोत्सवात बदलला आहे. आज तो केवळ एका मंडळाचा न राहता अख्ख्या अंबाजोगाईकरांचा स्वतःचा उत्सव बनला आहे. अंबाजोगाईमध्ये सगळ्यात मोठ्या प्रमाणात संपन्न होणारा हा एकमेव आणि अद्वितीय सोहळा




आहे, जिथे मान-पान, जात-पात किंवा कुठलाही भेद नसतो; असतो तो फक्त विठ्ठलनामाचा गजर!

तीन महत्त्वाचे आधारस्तंभ: योगदान आणि अचूक नियोजन

हा भव्य सोहळा दरवर्षी अधिक व्यापक, शिस्तबद्ध आणि यशस्वी करण्यामागे काही प्रमुख व्यक्तींचे योगदान अतिशय मोलाचे आहे:

माझे मोठे भाऊ श्री नंदकिशोरजी मुंदडा (नगराध्यक्ष, अंबाजोगाई): या सोहळ्याचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी या उपक्रमाला केवळ आपले नाव दिले नाही, तर आपली पूर्ण ताकद पाठीशी उभी केली. त्यांच्या खंबीर नेतृत्वाखाली 'वसुंधरा सेवा प्रतिष्ठान' अत्यंत ताकतीने या सोहळ्याच्या मागे उभे राहिले. काकाजींनी (श्री नंदकिशोर मुंदडा) हा सोहळा मनावर घेतल्यामुळेच याला अंबाजोगाईच्या मुख्य उत्सवाचे रूप प्राप्त झाले.

माझे मित्र तालमार्तंड श्री प्रकाश बोरगावकर: या संपूर्ण रिंगण सोहळ्याचे मुख्य सुत्रधार, संकल्पक आणि नियोजक म्हणून प्रकाश बोरगावकर यांचे योगदान खूप मोठे आहे. पालखी परंपरेची संपूर्ण रूपरेषा आखणे, दोन महिने आधी स्वतः नरसी आणि गंगाखेडला जाऊन संस्थानांना काकाजींच्या स्वाक्षरीचे अधिकृत निमंत्रण देणे, ही अवघड जबाबदारी ते दरवर्षी अत्यंत निष्ठेने सांभाळतात. त्यांच्या अचूक नियोजनामुळेच सोहळ्याची घडी अगदी व्यवस्थित बसली आहे.

सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आणि टीम: या सोहळ्याला यशस्वी करण्यासाठी दिलीपदादा सांगळे, बळीराम चोपणे, प्रशांत आदनाक,अनंत आरसुडे, महादू मस्के, शशिकांत नाना, अमोल घोडके, गायकवाड, बाबा महाराज जवळगावकर, मारुतीराव रेड्डी, दिलीप गित्ते, वसुंधरा सेवा प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सावता माळी भजनी मंडळाचे सर्व कार्यकर्ते अहोरात्र कष्ट घेतात. दिलीप गित्ते यांच्यावर पालख्यांना हार-तुऱ्यांनी सुंदर सजवण्याची आणि मगरवाडी येथील पेट्रोल पंपावर वारकऱ्यांसाठी चहा, पाणी व नाश्त्याची व्यवस्था करण्याची महत्त्वाची जबाबदारी असते. माजी उपनगराध्यक्ष दिलीप दादा सांगळे यांच्या वतीने संत श्रेष्ठ भगवान बाबा चौकामध्ये सर्व पालख्यांचे स्वागत करण्यात येऊन वाजत गाजत बँड पथकासह पालख्या योगेश्वरी मैदानावर घेऊन येण्याची जबाबदारी पार पाडली जाते. या सर्व कार्यकर्त्यांच्या सांघिक परिश्रमाशिवाय हा सोहळा पूर्ण होऊच शकत नाही.

भक्तीचा दिव्य सोहळा आणि अद्भूत परंपरा

जेव्हा या पालख्या भगवान बाबा चौकात येतात, तेव्हा स्वागताध्यक्ष श्री नंदकिशोर मुंदडा आणि संयोजन समितीच्या वतीने अश्वांची व पादुकांची पूजा करून पालख्यांचे जंगी स्वागत केले जाते. इथे एक अनोखी परंपरा पाळली जाते- 'कोंडूर' गावची दिंडी मैदानावरून भगवान बाबा चौकाकडे उलट्या दिशेने जाते. वारी पंढरपूरकडे जात असताना ही दिंडी उलट्या पावली केवळ यासाठी येते, जेणेकरून पालखी सोहळ्यातील इतर दिंड्यांना रिंगण खेळण्यासाठी अधिकृत निमंत्रण देता यावे.

मैदानात आल्यानंतर संयोजन समितीच्या वतीने सर्व दिंडी चालक, दिंडी मालक आणि विणेकऱ्यांचा सत्कार केला जातो. त्यानंतर वारकऱ्यांचे हुतुतू, हामामा, खो-खो, कबड्डी, कुस्ती आणि फुगड्यांसारखे पारंपरिक खेळ रंगतात. भजनी मंडळांच्या भजनासोबत पहिली प्रदक्षिणा पूर्ण होऊन रिंगण तयार केले जाते आणि मग अश्वाला (घोड्याला) रिंगणात सोडले जाते. अश्वाच्या धावण्याने आणि टाळ्यांच्या कडकडाटाने वातावरण हरखून जाते.

शालेय विद्यार्थ्यांची 'समूह दिंडी नृत्य स्पर्धा':

वारकरी संप्रदायातील समता आणि बंधुभाव लहान मुलांमध्ये रुजावा म्हणून शालेय विद्यार्थ्यांसाठी समूह दिंडी नृत्य स्पर्धेचे आयोजन केले जाते. नर्सरीपासून ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणी आणि संतांच्या वेशभूषेत, हातात पालखी घेऊन दिंडीचा नृत्याविष्कार सादर करतात, जे दृश्य खरोखरच डोळ्यांचे पारणे फेडणारे असते.

# गहिनीनाथ गडाच्या मानाच्या पालखीचे पंढरपूरकडे उत्साहात प्रस्थान

## विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या नेतृत्वात भक्तीचा महापूर

वामनभाऊ महाराज पालखी सोहळा भक्तीमय वातावरणात प्रस्थान

मानूर प्रतिनिधी ह्व

महाराष्ट्रातील तमाम वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आणि नवनाथ संप्रदायाचे प्रमुख केंद्र असलेल्या संतश्रेष्ठ गहिनीनाथ गडावरून आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे आज हजारो भाविकांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात प्रस्थान झाले. यावर्षीच्या पालखी सोहळ्याचे नेतृत्व आणि अध्यक्षपद गडाचे मठाधिपती ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री भूषवत आहेत. टाळ-मृदंगाचा गजर, 'माऊली-तुकाराम' आणि 'संत गहिनीनाथ महाराज की जय' या जयघोषाने संपूर्ण गड परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.पहाटेपासूनच धार्मिक विधींची रेलचेलपालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त गहिनीनाथ गडावर पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे मुख्य विठ्ठल रुक्मिणी मूर्ती आणि संत गहिनीनाथ महाराज यांच्या संजीवन समाधीला महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर भव्य महाआरती पार पडली. सकाळी गडावर विशेष कीर्तन आणि प्रवचनाचा कार्यक्रम झाला, ज्यामध्ये वारीचे महत्त्व आणि संतांचे विचार भाविकांसमोर मांडण्यात आले. या धार्मिक विधींनंतर मुख्य गाभाऱ्यातून संत गहिनीनाथ महाराजांच्या पादुका अत्यंत आदराने आणि शिस्तीत बाहेर आणून सजवलेल्या पालखीमध्ये आणि रथात विराजमान करण्यात आल्या.असा असेल पालखीचा मार्ग आणि मुक्कामह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली निघालेला हा पालखी सोहळा पारंपरिक मार्गाने पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहे. या प्रवासात पालखी विविध गावांमधील भाविकांना दर्शनाचा लाभ देत पुढे जाईल. पालखीचा मुख्य मार्ग खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे:निगडी ते निवडुंगा: पालखीचे पहिले टप्पे आणि स्वागत.मातकुळी मैदान: या ठिकाणी पालखीचा भव्य विसावा आणि रिंगण सोहळा होणार आहे.सारोळा व पिंपळगाव उंडा: ग्रामीण भागातील भाविकांकडून पालखीचे स्वागत.तांदळवाडी व मिरगव्हाण: या मार्गावरून जात असताना ठीकठिकाणी अन्नदान आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.वरकुटे मूर्तीचे व भोगेवाडी: भक्तांच्या निवासाची आणि भजनाची विशेष सोय.अरण: संत शिरोमणी सावता महाराज यांची ही कर्मभूमी असून, या ठिकाणी पालखीचा विशेष मुक्काम आणि दर्शन सोहळा होईल.पंढरपूर: शेवटी आषाढी एकादशीच्या महासोहळ्यासाठी पालखी चंद्रभागेच्या



तीरावर म्हणजेच पंढरी नगरीत दाखल होईल.शिस्तबद्ध वारी आणि प्रशासनाची तयारीपालखी सोहळ्यात हजारो वारकरी पायी चालत असून, वारीमध्ये महिला, तरुण आणि बाल गोपाळांचा मोठा सहभाग दिसत आहे. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सर्व वारकऱ्यांना शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. मार्गावरील गावांमध्ये ग्रामस्थांनी रस्ते स्वच्छ करून, रांगोळ्या काढून आणि सडे टाकून पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. प्रशासनाच्या वतीने आरोग्य पथके, शुद्ध पिण्याचे पाणी आणि सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.हा भक्तीचा प्रवास पुढील काही दिवसांत विविध टप्पे पार करत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये विलीन होईल, ज्यामुळे संपूर्ण मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात भक्तीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# ग्रामीण भागातून स्थलांतरामुळे मतदार पडताळणीपुढे आव्हान

परळी / प्रतिनिधी

निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) मोहिमेदरम्यान ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरामुळे मतदार पडताळणीच्या कामात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. रोजगार, शिक्षण, व्यवसाय तसेच इतर कारणांमुळे अनेक नागरिक शहरांकडे किंवा इतर जिल्ह्यांत स्थलांतरित झाल्याने संबंधित मतदार प्रत्यक्ष घरी उपलब्ध नसल्याचे चित्र दिसून येत आहे.

बूथ लेव्हल अधिकारी (इङज) आणि त्यांच्या सहाय्यकांकडून घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी केली जात आहे. मात्र अनेक घरांना कुलूप असल्याने किंवा कुटुंबातील सदस्य बाहेरगावी असल्याने पडताळणीचे काम अपेक्षित वेगाने पूर्ण होत नाही. काम वेगाने पूर्ण करा अथवा कारवाई करू असा प्रशासनाचा सज्जड इशारा आणि दुसऱ्या बाजूला मतदारांची अनुपस्थिती यामध्ये कार्यरत शिक्षक व इतर कर्मचारी कात्रीत अडकले असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

बीड जिल्हा हा ऊस तोड मजुरांचा जिल्हा म्हणून ओळखला जात असून गळीत हंगाम संपल्यावर जिल्ह्यातील बहुसंख्य कामगार हे मिळेल त्या ठिकाणी रोजगाराच्या कामानिमित्त स्थलांतरीत होतात. ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, तांड्यावरील शिक्षित मतदार देखील नौकरी, व्यवसाय किंवा पाल्याच्या शिक्षणासाठी स्थलांतरित झालेले आहेत.




निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) मोहिम राज्यात २९ जुलै पर्यन्त राबविण्यात येत असून या मोहिमेत नियुक्त बीएलओ आणि त्यांचे सहाय्यक मतदारांच्या घरी जाऊन माहिती संकलन आणि अद्ययावतीकरण करत असताना ग्रामीण भागात घरात वयोवृद्ध माता-पिता अथवा कोणीच नसल्याचे चित्र दिसून येत आहे. उपस्थित कुटूंबियांकडे घरातील सदस्यांची शास्त्रोक्त माहितीकरिता पुरावे देखील मिळत नसल्याने या कामी नियुक्त कर्मचाऱ्यांची कसरत होत आहे.

ग्रामीण भागातील या विदारक परिस्थितीत काम करत असताना नियुक्त कर्मचाऱ्यांना वेळेवर काम पूर्ण करा अथवा कारवाई करण्यात येईल असा सज्जड दम ही प्रशासनाकडून वारंवार देण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांचे काम करून देखील मानसिक संतुलन बिघडत जात असल्याचे बोलले जात आहे.

निवडणूक आयोगाच्या सूचनांनुसार प्रत्येक पात्र मतदाराची अचूक नोंद सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न केले जात असून स्थलांतरित मतदारांनी शक्य तितक्या लवकर आपल्या संबंधित इङज शी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. मतदार यादी अचूक व अद्ययावत राहण्यासाठी मतदारांनी नियुक्त कर्मचारी आणि प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक बनले आहे.

# शेतकर्यांवर अन्याय करु नका - बाळराजे पवार



गेवराई : गोरगरीब शेतकर्यांवर अन्याय करू नका, त्यांच्या शेत जमीनी गेल्या वर्षीच्या पावसाच्या अस्मानी संकटात खरडून गेल्या, उभी पिके अक्षरश: वाहून गेली आहेत. त्याचा मोबदला त्यांना मिळालाच पाहिजे, एकाही शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्या, नसता शेतकर्यांसाठी आंदोलन करावे लागेल, असा इशारा बाळराजे पवार यांनी दिला आहे. दरम्यान, शेतकर्यांवर अन्याय होणार नाही, या संदर्भात वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन पुढील निर्णय घेण्याचे आश्वासन उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार संजय सोनवणे यांनी दिले आहे.

गेवराई तालुक्यातील सिंदफणा आणि गोदावरी नदीच्या काठच्या शेतकर्यांची शेत जमीन गेल्या वर्षी पावसाळी हंगामात, म्हणजेच सप्टेंबर २०२६ च्या वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीने खरडून गेली होती.

या आस्मानी संकटात उभ्या पिकांचा दाणादाण उडाली, जमिनी खरडून गेल्या आणि शेतकऱ्यांचा हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेला होता. बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर कृषी विभाग, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून पंचनामे केले होते. हिरापूर, टाकळगाव, कानडा पिंपळगाव आणि एरंडगाव या चारही गावांतील मिळून जवळपास २५० एकर शेतजमीन आणि मोसंबी, आंबा, सीताफळाच्या फळबागा वाहून गेल्या होत्या. मात्र, जेव्हा सरकारी अनुदानाची यादी जाहीर झाली, तेव्हा शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला. २५० एकरचे नुकसान झाले असताना केवळ १० ते १२ शेतकऱ्यांची नावे यादीत आली आणि तीही अवघ्या ५ हजार रुपयांच्या मदतीसाठी, शेतकऱ्यांनी लावलेला आरोप अत्यंत गंभीर असून, या संदर्भात सोमवार ता. १३ रोजी दुपारी एक वाजता भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी वंचित राहीलेल्या शेतकर्यांसह तहसील कार्यालयात जाऊन, उपविभागीय अधिकारी शुभम पवार, तहसीलदार संजय सोनवणे यांची भेट घेऊन शेतकर्यांची बाजू मांडली.यावेळी नप चे माजी सभापती भरत गायकवाड, प्रा. येळापुरे, अशोक चव्हाण, सरपंच घाटूळ काका,सचीन गव्हाणे , जगन्नाथ गव्हाणे, दिनेश निर्मळ, दत्ता ढोरमारे, राजू पटेल, इस्माईल पटेल, गजानन गव्हाणे बाबू गव्हाणे, राहून धापसे , किशोर धापसे, रामप्रसाद गव्हाणे, महेश गव्हाणे ,सुनील गिरी यांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनी कडे जाणाऱ्या रस्त्याचे फोटो काढून ठेवावेत -तहसिलदार सुरेश घोळवे

मानूर प्रतिनिधी ह्व

अलीकडच्या काळात शेत जमिनीचे धारण क्षेत्र प्रतिकुटुंब कमी होणे, तसेच विविध कारणावरून एकमेकांशी असलेले मतभेद यावरून शेत रस्त्याचे प्रश्न बिकट बनत आहेत.

शेत रस्त्याची नवीन मागणी किंवा पूर्वीपासून वापरात असलेले रस्ते अडविण्याचे प्रकार वाढत असल्याने तहसील कार्यालयात अर्जाची संख्या वाढत आहे.

या अनुषंगाने शेतकऱ्यांनी कायदेशीर बाजू समजून घेणे आवश्यक आहे. गाव नकाशावर नोंद असलेले रस्ते- दोन सलगरेषा- सरासरी ३३ फूट, दोन तुटक रेषा १६.५ फूट, एक तुटक रेषा ८.२५ फूट या रुंदीचे असतात. त्यावर अतिक्रमण होऊ नये किंवा झाल्यास त्याविरुद्ध अर्ज करता येतो.

वीस वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून वहिवाटीखाली असलेले रस्ते हे कोणतेही कारण दाखवून अडविता येत नाहीत, त्याविरुद्ध मामलतदार कोर्ट ऍक्ट १९०६ च्या कलम ५(२) अन्वये दावा दाखल करता येतो.

तसेच शेतकऱ्याला त्याच्या शेतजमिनीस जाण्यासाठी कोणताही कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध नसल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ कलम १४३ अन्वये शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार सर्वे नंबरच्या सामायिक बांधावरून बारा फुटापर्यंत नवीन रस्ता मंजूर करता येतो..

नुकताच संत एकनाथ महाराज पालखी मार्गाच्या अनुषंगाने विघनवाडी-सवासे वस्ती,



सांगळवाडी- डोळ्याची वाडी, धनगरवाडी-हटकरवाडी या गावातील शेतकऱ्यांनी सहमतीने खाजगी जागेतून जवळपास सहा किलोमीटर इतका रस्ता तयार केला आहे.

ही बाब विचारात घेता इतर गावातील शेतकऱ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन शेत रस्त्यांच्या आडवाआडवी थांबवणे आवश्यक आहे. तसेच रस्त्याचे वाद सरपंच, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष यांच्या समन्वयातून व चर्चेतून गावपातळीवरच निकाली काढण्याची गरज आहे..

तरी देखील काही ठिकाणी रस्त्याची आडवाआडवी होऊ शकते, ही बाब विचारात घेऊन प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतजमिनीकडे जाणाऱ्या रस्त्याचे प्रत्येक १०० मीटर अंतरावर फोटो काढावेत व ते सातबारा सोबत जोडून ठेवावेत, जेणेकरून भविष्यात कोणी रस्ता अडविला तर त्याचा पुरावा म्हणून वापर करता येईल.

सुरेश घोळवे
तहसीलदार शिरूर कासार

# केज तालुका व शहर मातंग समाज बांधव यांची आज सायंकाळी महत्वाची बैठक

केज/प्रतिनिधी

केज शहर व तालुक्यातील मातंग समाजातील युवा कार्यकर्ते,महिला भगिनी,पेन्शनर, कर्मचारी,सामाजिक क्षेत्रातील सर्व संघटना, यांना आवाहन करण्यात येते की,१४ जुलै २०२६ मंगळवार रोजी शासकीय विश्रामगृह,केज येथे सायंकाळी ठीक ६-०० वाजता महत्त्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या बैठकीत खालील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन जेष्ठ नेते श्री.बाबुराव गालफाडे यांनी केले आहे.या बैठकीतील विषय पुढीलप्रमाणे आहेत.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती कार्यक्रम साजरा करणे,केज शहरातील क्रांतीगुरु लहुजी साळवे बाबा चौकाचे सुशोभीकरण करणे,ग्राम पंचायत,व नगर पंचायत कडे असलेल्या विकास निधीतुन अनुसूचित जाती,जमाती यांच्या वस्तीत १५ टक्के विकास निधीतुन पाणी,रस्ते,नाल्या, स्मशान भूमी ईत्यादी करण्यात यावेत, सरकारी गायरान जमीन,तसेच निवासी अतिक्रमणाचे मालकी हक्क देण्यात यावेत, विविध योजनेतील असलेल्या घरकुलाचे हफ्ते तात्काळ देण्यात यावेत तसेच ऐनवेळेचे विषय ही चर्चेत येणार असून यावर चर्चा होणार आहे.तरी सर्व समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बाबुराव गालफाडे सर,रोहित कसबे,अनिल लोखंडे, इरफान पठाण,शरद थोरात,उमेश आव्हाड, महादेव लांडगे,दिलीप गालफाडे,पांडुरंग कसबे यांनी केले आहे.

# छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दल उपविजेते; पोउनि. सतीश बडे यांची उल्लेखनीय कामगिरी

## मानूर गावांसाठी अभिमानाची बाब सुपुत्र पीएसआय सतीश बडे यांनी उपविजेतेपद पटकावले

मानूर प्रतिनिधी ह्व

२१ वा छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र पोलीस कर्तव्य मेळावा - २०२६ धाराशिव येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाने उत्कृष्ट कामगिरी करत उपविजेतेपद (ठ्रींपपशी-र्णि) पटकावले.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण सायबर पोलीस स्टेशन येथे कार्यरत पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे यांनी वैयक्तिक स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांनी सायंटिफिक एड टू इन्व्हेस्टिगेशन (फिंगरप्रिंट टेस्ट) या स्पर्धेत द्वितीय क्रमांक, तसेच क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन, क्रिमिनल लॉ व फिंगरप्रिंट टेस्ट या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाचा गौरव वाढविला.



या यशाबद्दल पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे यांनी सांगितले की, हा सन्मान विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. वीरेंद्र मिश्रा साहेब व पोलीस अधीक्षक श्री. प्रशांत जाधव साहेब यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे, तसेच वरिष्ठ अधिकारी, सहकारी आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या बळावर मिळाला आहे. भविष्यातही अधिक समर्पितपणे व व्यावसायिक कौशल्याने पोलीस सेवा बजावत राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

पोलीस कर्तव्य मेळाव्याचा मुख्य उद्देश पोलीस अधिकारी व अंमलदार यांना फॉरेन्सिक विज्ञान, फिंगरप्रिंट, डिजिटल पुरावे, सायबर तपास, गुन्हे अन्वेषण व आधुनिक वैज्ञानिक तपास पद्धती यामध्ये प्राविण्य मिळवून देणे हा आहे. अत्याधुनिक शास्त्रोक्त व डिजिटल पुराव्यांचा प्रभावी वापर करून गुन्ह्यांचा शास्त्रीय पद्धतीने तपास करणे, न्यायालयात सक्षम पुरावे सादर करणे आणि आरोपींना शिक्षा होण्यासाठी आवश्यक तपास कौशल्य विकसित करणे, हा या स्पर्धेचा प्रमुख उद्देश आहे.

या यशाबद्दल पोलीस उपनिरीक्षक सतीश बडे यांच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या या कामगिरीमुळे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाच्या नावलौकिकात आणखी भर पडलेली दिसत आहे...

# खरोळा येथील पिडीत कुटुंबाची आझाद क्रांती सेना पदाधिकारी यांची भेट

## आरोपी वर कठोर कारवाई करण्याची मागणी

केज/प्रतिनिधी

रेणापूर तालुक्यातील खरोळा येथे चोरीच्या संशयावरून तीन अल्पवयीन मुलांना झाडाला बांधून मारहाण करण्यात आल्याच्या घटनेची आझाद क्रांती सेना चे संस्थापक श्री.राजेश भाऊ घोडे,केज तालुकाप्रमुख श्री.शरद थोरात,केज तालुका उपप्रमुख श्री.अनिल लोखंडे,केज शहरप्रमुख श्री.ईरफान पठाण,अशोक भाऊ ढगे,किसन भिसे सर, संघटनेतील इतर पदाधिकाऱ्यांनी दखल घेत पीडित मुलांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.यानंतर आझाद क्रांती सेनाचे सेनाप्रमुख श्री.राजेश भाऊ घोडे यांनी रेणापूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक, यांची भेट घेऊन आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली.तसेच परिसरातील भीतीचे वातावरण दूर करण्या साठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात,अशी मागणीही करण्यात आली.यावेळी आझाद क्रांतीसेनाचे संस्थापक श्री.राजेश भाऊ घोडे यांनी



आरोपींमध्ये कायद्याची भीती निर्माण होईल अशी कठोर कारवाई करण्याची ही मागणी केले.या भेटीदरम्यान आझाद क्रांती सेना चे रेणापूरचे कार्यकर्ते व खरोळा गावचे असंख्य नागरिक उपस्थित होते.

# विद्यार्थी, युवकांच्या प्रश्नी परळीत जोरदार निदर्शने

परळी / प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा पूर्ववत ऑफलाइन पद्धतीनेच घेण्यात याव्यात, सर्व शासकीय विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत व पेपर फुटी विरोधात कडक कार्यवाही करून भविष्यात पेपर फुटी होणार नाही याची काळजी घ्यावी, या मागण्यांना घेऊन सोमवार दि १३ रोजी भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ संघटनेच्या वतीने परळी मध्ये आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात सहभागी विद्यार्थ्यांनी सांगितले की, राज्य लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा जर ऑनलाईन पद्धतीने घेतली, तर त्याचा सर्वात मोठा फटका ग्रामीण भागातील गरीब आणि कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना बसणार आहे. ग्रामीण भागात इंटरनेटच्या सुविधा, वीज पुरवठा आणि ऑनलाईन परीक्षांचे तंत्रज्ञान अजूनही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेले नाही. अशा परिस्थितीत




ऑनलाईन परीक्षेचा निर्णय म्हणजे ग्रामीण गुणवत्तेचा गळा घोटण्यासारखा आहे. त्यामुळे हा निर्णय तात्काळ रद्द झालाच पाहिजे.यासोबतच विविध शासकीय विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत, नीट परीक्षा असो की टीईटी परीक्षा या परीक्षा पेपर फुटी विरोधात कडक कार्यवाही करून भविष्यात पेपर फुटी होणार नाही याची काळजी घ्यावी.

यावेळी संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख, प्रवीण देशमुख, तालुका अध्यक्ष विजय घुगे, मनोज देशमुख,मुंजा नवगरे,तालुका सचिव सिद्राम सोळंके, इस्माईल शेख, प्रशांत मस्के, सोपान सोळंके, मदन राठोड, प्रकाश कावळे,अशोक जाधव यांच्यासह शेकडो युवक आणि स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी सरकारच्या धोरणांविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

# मतदार संघातील शेतकऱ्यांच्या मुला-मुलींसाठी सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय करण्याचे आमचे स्वप्न-माजी आ.भीमराव धोंडे

## प्रा.डॉ.बन्सीभाऊ वाळके व बाळासाहेब टेकाडे यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्यात प्रतिपादन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आपण १९८० मध्ये आमदार म्हणून निवडून आल्यानंतर सर्वप्रथम रुईनालकोल येथे पहिले विद्यालय सुरू केले. आज आमच्या शिक्षण संस्थेचे १०० ते १२५ शैक्षणिक युनिट्स कार्यरत असून या माध्यमातून हजारो विद्यार्थी घडले आहेत. आगामी काळात आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर जावे लागू नये म्हणून सर्व प्रकारच्या तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाची सोय मतदार संघातच करण्याचे आमचे स्वप्न आहे. याच ध्येयातून पाटोदा-कडा येथे इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करत असून, वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचाही आमचा विचार आहे. पालकांनीही आपल्या पाल्यांच्या प्रगतीकडे आणि व्यक्तिमत्व विकासाकडे जबाबदारीने लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिक्षण महर्षी, माजी आ.भीमराव धोंडे यांनी केले.

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आष्टी येथील भगवान महाविद्यालयातील प्रा. डॉ. बन्सीभाऊ वाळके सर आणि श्री. बाळासाहेब टेकाडे यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्यात ते अध्यक्षस्थाना वरून बोलत होते.




या सोहळ्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी आ. भीमराव धोंडे यांनी विशेष उपस्थिती लावून दोन्ही सेवावृत्तांचा सपत्नीक शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला आणि त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.या सेवापुर्ती सोहळ्यानिमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध शाहीर देवानंद माळी यांचा पोवाडा आणि शिवगीते चा बहारदार कार्यक्रम पार पडला. तसेच अहिल्यानगरचे प्रसिद्ध व्याख्याते व साहित्यिक संजय कळमकर यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान संपन्न झाले.

सत्कारातून व्यक्त होताना सत्कारमूर्ती प्रा. डॉ. बन्सीभाऊ वाळके भावुक झाले. ते म्हणाले की, मला शिक्षण महर्षी भीमराव धोंडे साहेबांनी नोकरी दिली तसेच समाजकारण आणि राजकारणात काम करण्याची मोठी संधी दिली. मी माझ्या आई-वडिलांचे आणि धोंडे साहेबांचे नाव खराब होईल असे कधीही वागलो नाही.या सोहळ्याप्रसंगी बोलताना इतर मान्यवरांनीही प्रा. डॉ. वाळके आणि श्री. टेकाडे यांनी शिक्षण क्षेत्रात व संस्थेच्या प्रगतीत दिलेल्या प्रदीर्घ व अमूल्य योगदानाचा गौरव केला. या भव्य सोहळ्याला बीड जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण सभापती नियामत बेग, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, आरपीआयचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, ड. भाऊसाहेब लटपटे, शिवाजी नाकाडे, परमेश्वर शेळके, इंजि. बाळासाहेब भुकन, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. सोपान निंभोरे, प्राचार्य डॉ. एस. एन. वाघुले, प्रा. डॉ. राम बोडखे, सरपंच बाळासाहेब गोफणे, सरपंच कारभारी गव्हाणे, अशोक लगड, नामदेव शेळके, डॉ. राज शेख, रवींद्र ढोबळे, ड. प्रदीप चव्हाण, गायकवाड महाराज, बाप्पा पाटील, सादीकभाई कुरेशी, राजेंद्र गव्हाणे, संजय धायगुडे, अन्सार शेख, पत्रकार उत्तम बोडखे, प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, अण्णासाहेब साबळे, पोपट चव्हाण, कांतीलाल गव्हाणे, डॉ. डी. बी. राऊत, प्राचार्य एस. जी. निशिगंध, मुख्याध्यापक राजू सय्यद, संजय कवडेंसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद, आजी-माजी विद्यार्थी आणि परिसरातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी केले तर प्रा. अनुराधा वाळके-शेलार, शिवाजी नाकाडे, भाऊसाहेब लटपटे आणि प्रदीप चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून सत्कारमूर्तींच्या कार्याला उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल हजारे आणि उपप्राचार्य डी. बी. वैद्य यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. अनुराधा वाळके यांनी मानले. अत्यंत नेटके आणि उत्साही वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

# शिवकृपा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचा प्रथम वर्धापन दिन व वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) शिवकृपा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, मुर्शदपूर, ता. आष्टी, जि. बीड यांच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. ११ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता अत्यंत उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात संपन्न झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणास्थान असलेल्या राजमाता जिजाऊ साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा पतसंस्थेच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमाणित लेखापरीक्षक शांतीलाल आजबे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ महाविद्यालय कडा येथील प्रा. डॉ. सुमनताई खेडकर, यशस्वी उद्योजिका श्रीमती अनिता धनवडे, यशस्वी क्लासच्या संचालिका श्रीमती संजीवनी टाळके, पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. दत्तात्रय नरसाळे, आष्टी तालुका मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष तथा पतसंस्थेचे उपाध्यक्ष तान्हाजी जंजिरे तसेच पतसंस्थेचे सहसचिव दत्तात्रय रेडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक करताना पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. दत्तात्रय नरसाळे यांनी गेल्या एका वर्षातील पतसंस्थेची




आर्थिक वाटचाल, सभासद नोंदणी, ठेवी, कर्जवाटप तसेच संस्थेच्या प्रगतीचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला. संस्थेच्या विकासासाठी सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त करत भविष्यात पतसंस्था अधिक सक्षम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

यावेळी प्रा. बाबासाहेब मुटकुळे, प्रा. टाळके सर, ज्येष्ठ मार्गदर्शक लक्ष्मण रेडेकर, एन. बी. पवार सर तसेच श्रीमती उषा रेडेकर यांनी मनोगत व्यक्त करत पतसंस्थेच्या कार्याचे कौतुक केले आणि संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ. सुमनताई खेडकर यांनी आपल्या मार्गदर्शनात महिलांना पतसंस्थेच्या व्यवस्थापनात व निर्णय प्रक्रियेत अधिक प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पतसंस्थेने विशेष उपक्रम राबवावेत, असे आवाहन त्यांनी केले.

पतसंस्थेचे उपाध्यक्ष तान्हाजी जंजिरे यांनी संस्थेची प्रगती ही केवळ संचालक मंडळाची नव्हे तर प्रत्येक सभासदाची जबाबदारी असल्याचे सांगितले. पतसंस्थेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सभासदांनी अधिकाधिक आर्थिक सहभाग नोंदविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. जागतिक स्तरावर यशस्वी ठरलेल्या सहकारी पतसंस्थांची उदाहरणे देत त्यांनी भविष्यात उपाध्यक्ष म्हणून संस्थेच्या विकासासाठी विशेष लक्ष देण्याची ग्वाही दिली.

अध्यक्षीय समारोपात प्रमाणित लेखापरीक्षक शांतीलाल आजबे यांनी सहकारी पतसंस्था सक्षमपणे चालविण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक शिस्त, पारदर्शकता, लेखापरीक्षणाची अचूकता आणि नियोजन यावर सविस्तर मार्गदर्शन केले. लेखापरीक्षणामध्ये अपेक्षित असलेल्या सर्व बाबींचा त्यांनी उहापोह केला. संस्थेची प्रगती साधायची असेल तर सर्वप्रथम संचालक मंडळाने स्वतः आर्थिक सहभाग वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आणि पतसंस्थेच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास श्रीमती मनीषा चौरे, श्रीमती जंजिरे, श्रीमती पोकळे, श्रीमती आजबे, श्रीमती राऊत, ज्येष्ठ पत्रकार सिताराम पोकळे, बन्सी बापू मोरे, शहादेव धनवडे, संदीप पवार, बाळासाहेब कुलकर्णी, गौतम खंडागळे, भगवान शिनगिरे, सदाशिव पोकळे, प्रमाणित लेखापरीक्षक कृष्णा ढगे, महादेव म्हस्के यांच्यासह अनेक मान्यवर, सभासद व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्रीमती सुवर्णा तरटे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार पतसंस्थेचे सहसचिव दत्तात्रय रेडेकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पतसंस्थेच्या व्यवस्थापिका श्रीमती सुवर्णा तरटे आणि कॅशियर शुभम पोकळे यांनी विशेष परिश्रम घेतल्याबद्दल त्यांचे उपस्थितांनी कौतुक केले.

# आ.सुरेश धस व जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड विकासकामांची पाहणी

भाविकांसाठी दर्जेदार सुविधा,भव्य मंदिर जीर्णोद्धार आणि गुणवत्तापूर्ण कामांवर भर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे सुरू असलेल्या विकासकामांची सोमवारी (दि. १३ जुलै) आ. सुरेश धस आणि बीडचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रत्यक्ष



पाहणी करून मंदिर जीर्णोद्धार कामांचा आढावा घेतला. गडावरील भव्य मंदिराच्या जीर्णोद्धारासह विविध विकासकामांची भव्यदिव्य, प्रगती आणि सुसज्ज नियोजनाची माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेण्यात आली.

यावेळी भाविकांना अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपत सर्व विकासकामे उच्च दर्जाची होणार असल्याचा विश्वास आ. सुरेश धस यांनी व्यक्त केला.

गडावर सुरू असलेला मंदिराचा भव्य-दिव्य जीर्णोद्धार, परिसर सुशोभीकरण, भाविकांसाठी मूलभूत सुविधा, रस्ते, पिण्याचे पाणी, अन्नदान छत्र, स्वच्छता तसेच इतर विकासकामांची सविस्तर माहिती घेऊन आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. विकासकामांमध्ये कोणतीही तडजोड होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही विश्वस्तांनी यावेळी सांगितले.

या पाहणीदरम्यान बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनीही विविध कामांची बारकाईने पाहणी करत आ. सुरेश धस व अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व विश्वस्त यांनी नियोजनबद्ध आणि गुणवत्तापूर्ण कामांमुळे श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा विकास अधिक गतिमान होईल आणि भाविकांना आधुनिक सुविधांसह अधिक चांगला धार्मिक अनुभव मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार सौ. वैशाली पाटील, श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड ट्रस्टचे अध्यक्ष, उपाध्यक्ष ,सचिव, विश्वस्त, विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी, पत्रकार तसेच स्थानिक मान्यवर, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी तालुक्यात तातडीने चारा डेपो व पशुधन छावण्या सुरु करण्याची पशुपालकांची मागणी

## चाऱ्याअभावी मुक्या जनावरांवर उपासमारीची वेळ

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यात जनावरांसाठी आवश्यक असलेल्या हिरव्या व सुक्या चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने पशुपालक शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. शेतकऱ्यांकडील उपलब्ध चाऱ्याचा साठा दिवसेंदिवस संपत चालला असून अनेक गावांमध्ये हिरवा चारा पूर्णपणे दुर्मिळ झाला आहे. परिणामी मुक्या जनावरांवर उपासमारीची वेळ येत असून शासनाने तातडीने चारा डेपो व पशुधन छावण्या सुरू करून पशुपालकांना दिलासा



द्यावा, अशी जोरदार मागणी तालुक्यातील शेतकरी व पशुपालकांकडून होत आहे.

आष्टी तालुका हा कायम दुष्काळी परिस्थितीचा सामना करणारा भाग म्हणून ओळखला जातो. येथील बहुतांश शेतकरी शेतीसोबतच दूध व्यवसाय, शेळी-मेंढीपालन आणि पशुपालनावर अवलंबून आहेत. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा कणा मानले जाते. मात्र यंदा चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने हजारो पशुपालक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

तालुक्यातील अनेक गावांमध्ये हिरवा चारा पूर्णपणे संपुष्टात आला असून सुका चारा देखील अत्यंत महाग झाला आहे. बाहेरील भागातून चारा आणण्यासाठी वाहतूक खर्चासह मोठी रक्कम मोजावी लागत असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर ही परिस्थिती गेली आहे. आधीच शेतीतील वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आता जनावरांच्या चाऱ्यासाठी रोजचा अतिरिक्त खर्च करावा लागत आहे.

चाऱ्याची उपलब्धता कमी झाल्यामुळे अनेक पशुपालकांना आपल्या जनावरांची विक्री करण्याचा कठीण निर्णय घ्यावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. पशुधनाची संख्या कमी झाल्यास दूध व्यवसायावर परिणाम होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा फटका बसण्याची शक्यता असल्याचे जाणकारांचे मत आहे.

गावनिहाय सर्वेक्षण करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

पशुपालक शेतकऱ्यांनी महसूल विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि पंचायत समिती प्रशासनाने संयुक्तपणे तालुक्यातील प्रत्येक गावातील चारा साठा, पशुधनाची संख्या आणि आगामी महिन्यांसाठी लागणाऱ्या चाऱ्याचे प्रमाण याचे तातडीने सर्वेक्षण करावे, अशी मागणी केली आहे.

ज्या गावांमध्ये चाऱ्याची गंभीर टंचाई आहे, त्या ठिकाणी शासनाने तातडीने चारा डेपो सुरू करून अनुदानित अथवा माफक दरात चारा उपलब्ध करून द्यावा. तसेच गंभीर परिस्थिती असलेल्या भागांत पशुधन छावण्या सुरू करून जनावरांसाठी चारा, पिण्याचे पाणी, पशुवैद्यकीय सेवा आणि आवश्यक औषधांची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

आष्टी तालुक्यातील खासदार, आमदार, माजी लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद व पंचायत समितीचे पदाधिकारी तसेच सर्वपक्षीय नेत्यांनी राजकीय मतभेद बाजूला ठेवून पशुपालकांच्या प्रश्नासाठी एकत्रितपणे शासन दरबारी पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

तालुक्यातील परिस्थिती अधिक गंभीर होण्यापूर्वी जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून शासनाला वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. आवश्यक निधी मंजूर करून चारा डेपो व पशुधन छावण्या तातडीने सुरू करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही